cmyk

अ



दैनिक

# राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०७ | रविवार दि.१८ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## माळ आठवी



अष्टमीचे दिवशी अष्टभुजा नारायणी हो ।
संह्याद्री पर्वती उभी पाहिली जगत्जननी हो
मन माझे मोहिले शरण आलो तुज लागुनी हो ।
स्तनपान देऊनी सुखी केले अंत:करणी हो ।।८।।

# शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत द्या!

## चारा छावण्याऐवजी थेट अनुदान द्या-रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. यासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी. फळबागांच्या नुकसानीपोटी हेक्टरी दीड लाख रुपये, शेतमजुरांना किमान २५ हजार रुपये मदत आणि चारा छावण्याऐवजी शेतकऱ्यांना थेट अनुदान द्यावे, आदी मागण्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केल्या. या मागण्यांवर सरकारने निर्णय घ्यावा अन्यथा सरकारसोबत रस्त्यावरचा संघर्ष करु आणि मंत्री व नेत्यांना रस्त्यावरही फिरू दिले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. ते शनिवारी (दि. १७ ऑक्टोबर) पुणे येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.**

राज्यातील दुष्काळाचे भीषण वास्तव, खरीप हंगामात झालेले नुकसान, जनावारांना चारा, शेळ्या-मेंढ्यांना जगवण्यासाठी नवीन योजनेची गरज, पिण्याच्या पाण्याची परिस्थिती, कर्जमाफी, महिला बचत गटांच्या कर्जाची गुंडांकडून केली जाणारी वसुली, फळबागांची परिस्थिती, स्थलांतराची भीती, पीक विमा योजनेतून १०० टक्के संरक्षित रक्कम मिळणे यासंदर्भात त्यांनी आकडेवारीसह पत्रकार परिषदेत सादरीकरणे केले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने तातडीने




उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. दुष्काळामुळे मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभाग मिळून एकूण ७७ हजार कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. खरीप हंगाम हातातून गेला असून आता रब्बीतदेखील काही येणार नाही. यामुळे खरीप आणि रब्बी मिळून १.१२ लाख कोटींचे नुकसान झाले आहे. राज्यात १४.५ लाख हेक्टरवर फळबागा आहेत. लाखो रुपये खर्च करुन तयार ▶▶ पान २ वर

### शेतमजुरांना २५ हजार मदत द्यावी

राज्यात सुमारे १ कोटी शेतमजूर आहेत. शेतमजुरांची उपजीविका शेतीच्या कामावर अवलंबून आहे. पण यंदा शेतात पीक नसल्यामुळे शेतमजुरांना काम मिळणार नाही. यामुळे शेतमजुरांना २५ हजार रुपये आर्थिक मदत द्यावी. दिवाळीपूर्वी विमान त्यांनी १० हजार रुपये आगाऊ मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात २०२६ पर्यंत मायक्रो फायनान्स अंतर्गत सुमारे ४५.९ लाख सक्रिय कर्जदार आहेत. त्यांच्याकडे एकूण २४,०८७ कोटी रुपयांची कर्जे थकीत आहेत. त्यांचा व्याजाचा दर २६ ते ३० टक्के असून ते एजंट लोकांकडून वसुलीसाठी तगादा लावत असल्याचे रोहित पवार यांनी निर्दशनास आणून दिले.

## थोडक्यात...

### एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

ग्रेटर नोएडा : उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडामधील रबुपुरा परिसरातील नागला श्री पदम गावात एकाच कुटुंबातील पाच जणांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. मृतांमध्ये पती-पत्नी आणि त्यांच्या तीन लहान मुलांचा समावेश आहे. या कुटुंबाने आदल्या रात्री नूडल्स खाल्ले होते. अन्नातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण काय आहे याचा शोध घेतला जात आहे. महेश (३७), त्याची पत्नी ललिता (३५) आणि त्यांची मुले लड्डू (११), मिष्टी (७) व साक्षात (३) अशी मृतांची नावे आहेत. शनिवारी सकाळी या घटनेची माहिती रबुपुरा पोलिसांना मिळाली. त्यानंतर स्थानिक पोलीस, वरिष्ठ अधिकारी, रुग्णवाहिका आणि अन्न सुरक्षा विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. फॉरेन्सिक टीम आणि पोलीस पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. तसेच, वैज्ञानिक पुरावे गोळा केले.

### सरकार मंदिर मालमत्तांची मालकी घेऊ शकत नाही

दिल्ली: राज्य सरकारवर मंदिरांच्या मालमत्तेचे रक्षण करण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. याचा अर्थ राज्य सरकार स्वत:च 'सार्वजनिक हित' किंवा 'प्रशासकीय सोयी'च्या नावाखाली 'गिफ्ट डीड' (दानपत्र) द्वारे अशा मालमत्ता आपल्या ताब्यात घेऊ शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने नोंदवले. तसेच तमिलनाडूच्या इरोड जिल्ह्यातील 'नागापालयम मरियम्मन-पोन्नाचियम्मन' मंदिराच्या मालकीची जमीन 'तालुका कार्यालय' बांधण्यासाठी राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय न्यायालयाने बेकायदेशीर ठरवला आहे. तामिलनाडूतील एका प्रकरणावर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने अशी भुमिका स्पष्ट केली आहे. यावेळी तमिलनाडू सरकारच्या भूमिकेवरही न्यायालयाने कडक शब्दांत ताशेरे ओढले.

### यूपीत योगींची सत्ता कायम राहणार?

लखनौ: उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत तरुण मतदारांची भूमिका महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. विशेषत: जेन-जीचा कल कोणत्या बाजूने राहणार, याबाबत चर्चा सुरू आहे. न्यूज१८ आणि पीव्हॅल्यू ॲनालिटिक्सने केलेल्या यूपी मेगा सर्व्हेत योगी आदित्यनाथ सरकार आणि आगामी निवडणुकीबाबत जनतेचा कल समोर आला आहे. सर्व्हेत सहभागी ५६ टक्के लोकांनी आगामी निवडणुकीत जेन-जीची भूमिका महत्त्वाची राहील, असे मत व्यक्त केले. १६.२ टक्के लोकांनी मात्र जेन-जीची भूमिका महत्त्वाची राहणार नसल्याचे सांगितले. तर १४.२ टक्के लोकांनी जेन-जीबाबत आपल्याला पुरेशी माहिती नसल्याचे म्हटले आहे.

# महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात मान्सूनची माघार झाल्यानंतर उष्णतेत वाढ झाली असतानाच आता पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत पुन्हा पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूरसह काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. काही भागांसाठी ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा इशाराही देण्यात आला आहे.**



पुणे जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून उष्ण आणि कोरडे वातावरण आहे. मात्र, हवामान विभागाच्या अंदाजानुसार ▶▶ पान २ वर

# बीडच्या दुष्काळावर मात करण्यासाठी प्रशासनाला तत्परतेचे निर्देश

## सुनेत्रा पवारांकडून दुष्काळी परिस्थितीचा आढावा; २२५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा

बीड प्रतिनिधी

**पावसाने दीर्घकाळ खंड दिल्याने बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. पीक नुकसान पंचनामे तातडीने पूर्ण करणे, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे, जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन आणि रोजगार हमीची कामे प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.**



जिल्ह्यात पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्याचे निर्देशही कृषी व महसूल विभागाला देण्यात आले. जिल्ह्यात सध्या २२५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, टँकरच्या फेऱ्यांवर जीपीएस प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्यास ▶▶ पान २ वर

# दुष्काळाकडे संधी म्हणून बघा,गावातले पाणी गावातच जीरवा-तुकाराम मुंढे

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

**दुष्काळाकडे केवळ समस्या म्हणून पाहू नका, तर त्यात संधी शोधा, असा महत्त्वपूर्ण सल्ला आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. पिंपरी-चिंचवडमधील 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'मध्ये बोलताना त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. आव्हान म्हणून नव्हे तर प्रॉब्लेम स्टेटमेंट म्हणून बघा, दुष्काळ का येतो, पुढील सहा ते सात महिन्यात काय करु शकतो, याचा विचार करा**



**असे तुकाराम मुंढे म्हणाले. तुकाराम मुंढे यांनी दुष्काळाच्या काळात दुग्ध व्यवसायात संधी असल्याचे सांगितले. याशिवाय ग्रामीण भागात पाणी अडवा पाणी जिरवाची गरज असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.**

मी अन्न व औषध प्रशासन क्षेत्रात काम करतो, त्यामध्ये दूध येते. आपल्याकडे दुधाची कमतरता आहे का तर आहे. दूध उद्योजक वाढू शकतो का वाढू शकतो. दूधाला दर मिळू शकतो का, अजूनही वाढू शकतो. दोन चार महिन्यात दर वाढलेले आहेत आणखी वाढतील. या क्षेत्रातील गैर प्रकार रोखले पाहिजेत, यात मी नियामक म्हणून काम करतोय, यात सगळ्यांचा सहभाग हवा आहे, असे मुंढे यांनी म्हटले. पशुसंवर्धन विभागात ▶▶ पान २ वर

# नाना पाटेकर की कॅप्टन स्मित मच्छार?

## मुंबईतील रेल्वे पुलाच्या नामकरणावरून वाद, ठाकरे सेना भाजप आमनेसामने

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतील विद्याविहार रेल्वे स्थानकाजवळ नव्याने बांधण्यात आलेल्या पूर्व-पश्चिम विद्याविहार पुलाच्या नामकरणावरून हा पूल वाहतुकीसाठी खुला होण्यापूर्वीच वाद निर्माण झाला आहे. भाजपचे आमदार पराग शहा यांनी या पुलाला कॅप्टन स्मित मच्छार यांचे नाव देण्याची मागणी केली होती. त्यानंतर काही दिवसांतच, ठाकरेसेनेने (यूबीटी) या पुलावर एक बॅनर लावून, या पुलाला दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांचे नाव देण्याची मागणी केली आहे.

आमदार शहा यांनी प्रशासनाला पत्र लिहून



या पुलाला कॅप्टन स्मित मच्छार यांचे नाव देण्याची विनंती केली होती. कॅप्टन मच्छार हे एक भारतीय व्यावसायिक वैमानिक आहेत, ज्यांनी तेल अवीवच्या दिशेने ▶▶ पान २ वर

# सत्ता सोडण्याची हीच योग्य वेळ; कपिल सिब्बल यांचा राजनाथ सिंग यांना टोला

दिल्ली । वृत्तसंस्था

राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी शनिवारी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग यांच्या सत्ता परिवर्तनाच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले. सिब्बल म्हणाले की, जनताच सत्ता परिवर्तन करु इच्छिते आणि आता या सरकारची जाण्याची वेळ आली आहे. राजनाथ सिंग यांनी शुक्रवारी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांवर जोरदार ▶▶ पान २ वर



# गोकुळसाठी आज मतदान!

## • सतेज पाटलांची कडवी झुंज, निकराच्या लढातीकडे महाराष्ट्राचे लक्ष

कोल्हापूर । प्रतिनिधी

गेल्या अनेक महिन्यांपासून पात्र-अपात्रचे राजकारण, चौकशीसाठी झालेलं राजकारण, प्रशासक नेमणुकीचे राजकारण ते भर निवडणुकीच्या पात्र संस्थांच्या ठरावधारकांना यल्लामाच्या डोंगरावर नेत परडी भंडाऱ्यावर हात मारून शपथ देण्यापर्यंत ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१६ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.०० क्विंटल | २,५०० | २,७६६ | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड: ८८.५० क्विंटल | २,७५१ | ६,००० | ४,४१८ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ९,६०० | ९,८५१ | ९,७३७ |
| बाजरी: १.०० क्विंटल | २,७५० | २,७५० | २,७५० |
| मुग: ८.०० क्विंटल | ९,५०० | ९,५०० | ९,५०० |
| सोयाबीन: ११९.५० क्विंटल | ६,८१० | ७,२२४ | ७,०२३ |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ६,७०० | ७,६०० | ७,१३० |

# विजय झाला की म्हणतात यांनी कामच केलं नाही, असे व्हायला नको!

## पंकजा मुंडेंचा सोळुके, धसांचे नाव न घेता चिमटा




विशेष प्रतिनिधी । बीड

**गेल्या विधानसभा निवडणुकीपासून भाजपचे आ.सुरेश धस, राष्ट्रवादीचे आ.प्रकाश सोळुंके व भाजपाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्यात धुसफूस पाहायला मिळत असतानाच, आता पंकजा मुंडे यांनी सुरेश धस व आ.प्रकाश सोळुंके यांचे नाव न घेता त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला. महायुतीचे अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलताना पंकजा मुंडे यांनी अप्रत्यक्षपणे घेतलेल्या या समाचारामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.**



विधानसभा निवडणुकीत आष्टी मतदारसंघातून विजय मिळवल्यानंतर आ. सुरेश धस यांनी भाषणादरम्यान पंकजा मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. निवडणुकीत पंकजा मुंडे यांनी माझे काम केले नाही, उलट पाडण्यासाठी प्रयत्न केले, असा आरोप करत धस यांनी जाहीर सभेत खंत व नाराजी व्यक्त केली होती. त्यांच्या या विधानावरून बीड भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला होता. त्या सोबतच माजलागावचे राष्ट्रवादीचे आ.प्रकाश सोळुके यांनी परळीच्या मुंडे बहिण-भावानी माझ्या परभावासाठी प्रयत्न केले असा आरोप केला होतो. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारसभेत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांनी या सर्व आरोपांना नाव न घेता टोला लगावला. त्या म्हणाल्या की, काही ▶▶ पान २ वर

### धोंडे म्हणाले नियोजन करा...

याच प्रचार सभेदरम्यान आष्टी- पाटोद्याची माजी आमदार भीमराव धोंडे यांनी विद्यमान उमेदवाराला अफलातून सल्ला दिला. मी नियोजनात कमी पडल्यामुळे माझा पराभव झाला, तुम्ही नियोजन करा. नियोजन म्हणजे काय तुम्हाला चांगलेच ठाऊक आहे, असे धोंडे म्हणाले. धोंडे यांच्या वक्तव्यावरून महायुतीच्या उमेदवाराचे नियोजन ढासळले असल्याचे बोलले जात आहे.

# अभिजीत दीपके यांना सशर्त जामीन



दिल्ली । वृत्तसंस्था

कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) चे संस्थापक अभिजित दीपके यांना काही अटींच्या अधीन राहून जामीन मंजूर करण्यात आला आहे. शांतता राखण्याबाबतच्या बंधपत्रावर (पीस बाँड) स्वाक्षरी केल्यानंतर त्यांची सुटका केली ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# डिजिटल आवाजाला सत्तेचा गळफास का?

## मोदींच्या सत्ताप्रवासात सोशल मीडियाचा वापर; आता त्याच माध्यमांतील प्रश्न सरकारला असह्य का?

लोकशाहीत सत्ता मिळवण्यासाठी जनतेच्या आवाजाचा उपयोग करायचा आणि सत्ता मिळाल्यानंतर त्याच आवाजाने प्रश्न विचारले की त्याला नियमांचा बडगा दाखवायचा, हा विरोधाभास लोकशाहीसाठी धोकादायक आहे. स्मार्टफोन, स्वस्त इंटरनेट आणि समाजमाध्यमांनी माहितीच्या जगात क्रांती घडवली. वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी या पारंपरिक माध्यमांच्या पलीकडे जाऊन सामान्य नागरिकालाही बातमीदार, विश्लेषक आणि सत्तेला प्रश्न विचारणारा पत्रकार बनण्याची संधी मिळाली. या बदलाचे स्वागत करण्याऐवजी डिजिटल आवाजाकडे संशयाने पाहिले जात असेल, तर तो केवळ पत्रकारितेचा नव्हे, तर लोकशाहीच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीने भारतीय राजकारणात समाजमाध्यमांच्या प्रभावाचे नवे पर्व सुरू केले. नरेंद्र मोदी यांच्या प्रचारात फेसबुक, ट्विटर, यूट्यूब, व्हॉट्सप, एसएमएस, डिजिटल संवाद आणि तंत्रज्ञानाधारित प्रचाराचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. त्या निवडणुकीचे विश्लेषण करणाऱ्या संशोधनातून डिजिटल माध्यमे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि राजकीय संदेश प्रसारित करण्यासाठी महत्त्वाची ठरल्याचे स्पष्ट होते. भाजपने २८२ जागा जिंकून स्वबळावर बहुमत मिळवले. अर्थात, या विजयाचे संपूर्ण श्रेय सोशल मीडियाला देता येणार नाही; मात्र प्रचाराच्या रणनीतीत त्याचे योगदान दुर्लक्षित करता येत नाही. त्यावेळी पारंपरिक माध्यमांवर अवलंबून न राहता जनतेपर्यंत थेट पोहोचण्याची ताकद डिजिटल माध्यमांनी दाखवून दिली. प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविरुद्ध नाराजी व्यक्त करणारे, भ्रष्टाचारावर प्रश्न उपस्थित करणारे आणि बदलाची अपेक्षा करणारे अनेक आवाज या माध्यमांतून पुढे आले. आज मात्र याच डिजिटल विश्वातून सरकारच्या धोरणांवर, बेरोजगारीवर, महागाईवर, भ्रष्टाचाराच्या आरोपांवर आणि प्रशासकीय अपयशावर प्रश्न उपस्थित झाले, तर त्यांच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले जाते, हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. सरकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी समाजमाध्यमांवरील प्रभावकांचा वापर करणे गैर नाही. मात्र, सरकारी योजनांचे कौतुक करणाऱ्या डिजिटल निर्मात्यांना प्रोत्साहन आणि टीका करणाऱ्यांना संशयाच्या नजरेने पाहिले जात असेल, तर समान नियमांचा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक टीका सत्य असेलच असे नाही आणि प्रत्येक डिजिटल पत्रकाराची माहिती अचूक असेलच असेही नाही. खोटी माहिती, बदनामी, द्वेषपूर्ण भाषण आणि जाणीवपूर्वक दिशाभूल यांच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. पण टीका आणि गुन्हा यांत फरक केला पाहिजे. सरकारविरोधी मत म्हणजे आपोआप देशविरोधी कृत्य ठरत नाही. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) नुसार नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार आहे. अनुच्छेद १९(२) अंतर्गत त्यावर काही वाजवी निर्बंध आहेत; परंतु निर्बंधांचा वापर टीका दडपण्यासाठी होऊ नये. डिजिटल पत्रकारांना कायद्याबाहेरचे विशेष संरक्षण मिळत नाही, पण त्यांचे माध्यम वेगळे आहे म्हणून त्यांचे मूलभूत अधिकारही कमी होत नाहीत. कारवाईची भीती निर्माण झाली की पत्रकार स्वतःहून प्रश्न विचारणे टाळतात. या परिस्थितीला 'चिलिंग इफेक्ट' म्हणतात. परिणामी, बातमी प्रसिद्ध होण्यापूर्वीच तिच्यावर भीतीची सेन्सॉरशिप लागू होते. लोकशाहीत न्यायालयीन पुनरावलोकन, पारदर्शक प्रक्रिया आणि कारवाईविरोधात दाद मागण्याची संधी महत्त्वाची ठरते. डिजिटल पत्रकारितेला अमर्याद स्वातंत्र्य नको; पण सत्तेला अमर्याद अधिकारही नकोत. माध्यमांनी तथ्य पडताळावे, चुका दुरुस्त कराव्यात आणि जबाबदारी स्वीकारावी. सरकारनेही टीकेला उत्तर द्यावे, प्रश्न विचारणाऱ्यांना शत्रू समजू नये आणि कायद्याची अंमलबजावणी भेदभावरहित ठेवावी. ज्या डिजिटल माध्यमांनी मोदींच्या राजकीय प्रचाराला व्यापक पोहोच मिळवून दिली, त्याच माध्यमांतून आज सरकारला प्रश्न विचारले जात असतील, तर त्याचे उत्तर बंदी, दबाव किंवा भीती नसून अधिक पारदर्शकता असले पाहिजे. लोकशाहीची खरी कसोटी सत्तेचे समर्थन करणाऱ्यांना किती मोकळीक आहे, यात नसते; तर सत्तेला अस्वस्थ करणारे प्रश्न विचारणाऱ्यांना किती निर्भयपणे बोलता येते, यात असते. डिजिटल आवाज बंद करण्याऐवजी त्याला उत्तर देणे, हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

# पदवीधरांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प!

## डॉ.अशोक कोल्हे यांचा विकासाचा कृतीशील जाहीरनामा चर्चेत

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर उमेदवार डॉ. अशोक दत्तात्रय कोल्हे यांनी पदवीधरांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प पत्रकार परिषदेत मांडला आहे. शिक्षण, रोजगार, शेती, सिंचन, उद्योग, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकास अशा विविध क्षेत्रांना स्पर्श करणारा त्यांचा विकासाचा कृतीशील जाहीरनामा सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.**



बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष प्रामाणिक अधिकारी परिचित असलेले सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक कोल्हे हे सध्या पदवीधर मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आहेत. त्यांनी उमेदवारी संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी बीड येथील हॉटेल नीलकमल येथे शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सेवानिवृत्त अभियंता इंजि. जी.एन. भोरे, जिल्हा कार्याध्यक्ष गौतम चोपडे, जिल्हा सचिव कांचन गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम पवार, आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेमध्ये अधिक माहिती देताना उमेदवार सेवानिवृत्त सनदी अधिकारी डॉ.अशोक कोल्हे यांनी पदवीधर युवक, शेतकरी, महिला, व्यावसायिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका मांडली आहे. केवळ निवडणुकीपुरती आश्वासने न देता, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या माध्यमातून विकास साधण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. आधुनिक शेती, नैसर्गिक शेती, कृषी संशोधन केंद्रे, सिंचन सुविधा, जलसंधारण, शेतमाल प्रक्रिया उद्योग आणि शेतकऱ्यांसाठी बाजारपेठेची उपलब्धता यांवर त्यांनी भर दिला आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योग उभारणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे, ही त्यांच्या विकास संकल्पनेतील महत्त्वाची सूत्रे आहेत. मराठवाड्यातील पाणीटंचाई, अनियमित पाऊस आणि शेतीसमोरील संकटे लक्षात घेता, सिंचन व जलसंधारणाच्या सुविधांना प्राधान्य देण्याची भूमिका शेतकरी वर्गासाठी महत्त्वाची ठरू शक पदवीधरांच्या रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी रोजगारनिर्मिती, उद्योगांना मार्गदर्शन, स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि कौशल्यविकास यावर भर देण्यात आला आहे. एमएसएमई उद्योगांना आर्थिक व तांत्रिक मदत, ग्रामीण भागात उद्योगवाढ आणि स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा संकल्प त्यांनी मांडला आहे.याशिवाय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांची उभारणी, डिजिटल व ऑनलाइन शिक्षण सुविधा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, ग्रंथालये आणि शासकीय नोकरभरतीसाठी मार्गदर्शन अशा उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळावा, हा या संकल्पनेमागील उद्देश आहे. या प्रसंगीं महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी व कर्मचारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष जालिंदर भोरे, गौतम चोपडे,तुकाराम पवार,,कांचन गायकवाड, जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे बळीराम उबाळे, राम शेळके,शिवनाथ आबुज,भागवत औताडे, इ.उपस्थित होते.

# बीडचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर,मा.आ.सय्यद सलीम प्रयत्नशील

**बीड । प्रतिनिधी**

**नगरपरिषद अंतर्गत असलेल्या अमृत अटल पाणीपुरवठा योजनेचे ९५ टक्के काम पूर्ण होऊनही, केवळ नगरपरिषदेकडे असलेल्या ३६ कोटी वीजबीलाच्या थकबाकीमुळे असल्याने नवीन अतिरिक्त वीजभार जोडणी मिळत नसल्याने धुळखात पडून आहे. हा प्रश्न निकाली लागवा आणि शहरातील ३ लाख नागरिकांची तहान भागावी यासाठी आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांची तळमळ आहे. यामुळे आ. संदीप क्षीरसागर हे प्रत्येक अधिवेशनात हा जिव्हाळ्याचा मुद्दा उपस्थित करीत आहेत. मात्र यावर शासन लक्ष देत नाही. तसेच अनेकवेळा आ. क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी महावितरण आणि जिल्हाधिकारी यांच्याही बैठका घेऊन ही अडचण सोडविण्याची मागणी केली. तसेच याप्रकरणी सन २०२४ मध्ये त्यांनी औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने डीपीडिसीतून निधी उपलब्ध करुन प्रश्न सोडविण्याचे निर्देश दिले होते. तरीही यावर काहीच हालचाल झाली नाही. सध्या दुष्काळी परिस्थिती पाहता डिसेंबर पासून शहराला पाणी मिळेल की, नाही हा गंभीर प्रश्न आहे. यामुळे पुन्हा आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी परत हा प्रश्न न्यालयाते घेऊन गेले असून, औरंगाबाद खंडपीठात अवमान याचिका दाखल केली आहे. यावर आता ४ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे.**





बीड शहराची सध्या ३ लाख लोकसंख्या आहे. या लोकसंखेच्या तुलनेत ४० एमएलटी पाणी मिळणे आवश्यक असताना केवळ ३० टीएमएलटी पाणी मिळत आहे. त्यात माजलगाव बॅकवॉटरचे २४ आणि बिंदुसरा पाणीपुरवठा योजना ६ एमएलटी असे पाणी येते. मात्र आता बिंदुसरा धरण शेवटच्या घटका मोजत असल्याने हे पाणी कधीही बंद होऊ शकते यामुळे शहरात पाणीबाणी निर्माण होणार यात शंका नाही. डिसेंबर महिन्यापासून शहरातील ३ लाख नागरिकांना पाणी मिळेल की, नाही अशी चिंता आहे. यामुळे १२५ कोटी खर्च करुन उभारलेली २५ एमएलटीची अमृत अटल पाणीपुरवठा योजना कार्यान्वित व्हावी आणि शहरातील नागरिकांची तहान भागावी ही आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांची तळमळ आहे. यासाठी मागील अनेक वर्षांपासून न्यायालय, शासन, प्रशासन या स्तरावर लढाई लढत आहेत. मात्र या अतिमहत्वाच्या प्रश्नावर शासन आणि प्रशासनाची उदासीनता आहे. आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी नगरपालिकेची वीज थकबाकी भरुन अमृत अटल योजनेला अतिरिक्त वीजभार जोडून द्यावा यासाठी शासन रबारी अनेकदा प्रयत्न केले. यात काही यश आले नाही. यामुळे त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावेळी न्यायालयाने ११ जून २०२४ आणि ८ ऑगस्ट २०२४ रोजी निर्देश दिले होते की, प्रधान सचिव नगरविकास महाराष्ट्र राज्य आणि जिल्हाधिकारी यांनी महावितरणची बैठक घेऊन वीज थकबाकी नियोजन समितीच्या माध्यमातून निधी मंजूर करुन भरण्याचे निर्देश दिले होते. यानंतर जिल्हाधिकारी आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. यानंतर तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनीही बैठक घेतली मात्र यामध्ये त्यांनी नगरपालिकेने उत्पन्न वाढवून टप्प्याटप्प्याने वीज थकबाकी भरावी असे सांगितले आणि हा विषयच क्लोज करुन एकप्रकारे गॅनबाची मेख मारली आणि पुन्हा हा मुद्दा जिथे होता तिथेच आला. धनंजय मुंडे यांच्यामुळे एकप्रकारे बीडकरांच्या तोंडाचे पाणी पळाले आहे. यावर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती असून जमिनीची पाणी पातळी अंत्यत खालावली असून जमिनीत पाणीच शिल्लक नाही असे चित्र आहे. त्यात बिंदुसरा कोरडे पडल्यात जमा असल्याने आता शहराची पूर्ण मदार माजलगाव बॅकवॉटरवर अवलंबून आहे. सध्या दोन्ही पाणीपुरवठा सुरू असूनही २० दिवसाआड पाणी येत असल्याने डिसेंबर मध्ये काय परिस्थिती असेल आणि शहराची तहान कशी भागणार ही चिंता आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांना सतावत आहे. यामुळे २०२४ मधील जनहित याचिकेच्या निर्देशावर अंमल न झाल्याने एकप्रकारे त्याचा अवमान झाला आहे. यामुळे आ. क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद यांनी परत एकदा न्यायालयाचे दार ठोठावले आहे. याप्रकरणी पुन्हा दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी अवमान याचिका क्र. सीपीएसटी / ३३९६२/२०२६ दाखल केली आहे. यामुळे आता यात यांना यश यावे आणि बीडचा सुटावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ५०० चा बॉण्ड ३५०० रुपयांना विकणारा एसीबीच्या जाळ्यात

**गेवराई । प्रतिनिधी**

मागील तारखेतील ५०० रुपयांचा बॉण्ड ३५०० रुपयांना विक्री करणाऱ्या अंकुश पाचपोतेला एसीबीच्या पथकाने शनिवारी (दि.१७) रंगेहात पकडले आहे. गेवराईच्या तहसील कार्यालयात अंकुश पाचपोते बॉण्ड विक्रेते म्हणून काम करत आहेत.तक्रारदार याला मागील तारखेत बॉण्ड हवा असल्याने ५०० रुपयांच्या बॉण्डसाठी त्याने ३५०० रुपयांची मागणी केली होती.याची तक्रार बीडच्या एसीबीकडे आल्यानंतर त्यांनी गेवराईच्या तहसील कार्यालयाजवळ सापळा रचून ही कारवाई केली आहे.दरम्यान एसीबीच्या मागच्या काही दिवसांत कारवायांचा वेग वाढल्याने लाचखोरांची धाबे दणाणले आहेत.अंकुश पाचपोतेला बीडच्या कार्यालयात आणण्यात आल्याची माहिती एसीबीचे डीवायएसपी सोपान चित्तमपल्ले यांनी दिली आहे.

# उमेदवार वाऱ्यावर सोडायचे हेराष्ट्रवादी शरदचंद्र पवारांच्या पक्षाचा कारभार -बागवान



**गेवराई । प्रतिनिधी**

निवडणुकीच्या रणांगणात उमेदवार उतरवायचे, त्यांना पक्षाचा झेंडा द्यायचा, विजयाची स्वप्ने दाखवायची आणि प्रत्यक्ष प्रचाराची वेळ आली की त्यांना वाऱ्यावर सोडून द्यायचे; बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची कार्यपद्धती अशीच आहे का, असा थेट सवाल माजी नगरसेवक तथा पॅनलप्रमुख जानमोहम्मद बागवान यांनी उपस्थित केला आहे. गेवराई नगरपरिषद निवडणुकीतील पक्षाच्या भूमिकेवरून त्यांनी राष्ट्रीय नेतृत्व, खासदार सुप्रिया सुळे, आमदार आणि जिल्हाध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर जोरदार निशाणा साधला. नगरपरिषदेच्या निवडणुकीतच नव्हे, तर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतही पक्षाचे नेतृत्व नेमकी कोणती भूमिका बजावणार, हा प्रश्न आता उपस्थित होत असल्याचे बागवान यांनी म्हटले.गेवराईत नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह १४ उमेदवारांना निवडणुकीच्या मैदानात उतरवायचे; पण त्यांच्यासाठी प्रचाराची धुरा सांभाळायला पक्षातील मोठ्या नेत्यांनी यायचेच नाही, अशी परिस्थिती असेल तर मग पक्षाचे नेतृत्व नेमके कोणासाठी आहे. केवळ उमेदवारी जाहीर करून जबाबदारी संपते का. उमेदवारांनी स्वतःच्या ताकदीवर निवडणूक लढवायची, कार्यकर्त्यांनी स्वतःच्या खिशातून खर्च करायचा आणि निकालानंतर विजयाचे श्रेय मात्र पक्षाने घ्यायचे, असा प्रकार असेल तर त्याला संघटनात्मक बांधिलकी म्हणायचे की राजकीय सोय, असा थेट सवाल बागवान यांनी उपस्थित केला.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना हेक्टरी १

केलेल्या या फळबागा दुष्काळात जगवणे मोठे आव्हान आहे. एनडीआरएफच्या निकषानुसार फळबागांसाठी हेक्टरी केवळ २२,५०० रुपये मिळणार असून, ही मदत अत्यंत तुटपुंजी आहे. यामुळे फळबागांच्या नुकसानीसाठी कमीत कमी हेक्टरी १.५० लाख रुपये देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात सद्यस्थितीत हिरव्या चाऱ्याची २२.८० टक्के आणि सुक्या चाऱ्याची २१.४५ टक्के तूट आहे. अमरावती विभागात सर्वाधिक चारा टंचाई आहे. सरकार डिसेंबर महिन्यानंतर गरजेनुसार चारा छावण्या सुरु करणार आहे. पण मागील दुष्काळाच्या काळात छावण्यांमध्ये झालेले गैरव्यवहार पाहता चारा छावण्याऐवजी शेतकऱ्यांना थेट अनुदान द्यावे. परंतु अनुदान दिले तर जास्त पैसे लागतील म्हणून सरकारने शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करुन चारा छावणी उभारण्याचा निर्णय घेतला, अशी टीका त्यांनी केली.

----------

### बीडच्या दुष्काळावर मात

सांगण्यात आले. पिण्यायोग्य पाण्याचा वापर बांधकामासाठी करू नये आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे निर्देश देण्यात आले. जलस्रोतांचे पुनर्भरण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि विहिरींची दुरुस्ती अशी जलसंवर्धनाची कामेही तातडीने हाती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. जनावरांच्या चाऱ्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच नियोजन करावे. शेतकऱ्यांना मुरघास, हायड्रोपोनिक्स आणि अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे, असे बैठकीत सांगण्यात आले. तसेच वीबी-जी रामजी योजनेअंतर्गत रोजगार हमीची कामे जलसंवर्धनाशी जोडून राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होऊन स्थलांतर टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या काळात नागरिकांनी अनावश्यक खर्च टाळावा, लग्न व वाढदिवसांवरील खर्च कमी करावा आणि सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करावे, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले. या बैठकीस आमदार प्रकाश सोळुंके, आमदार धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दुष्काळी संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी शासन आणि प्रशासनाकडून सर्व स्तरांवर उपाययोजना करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

-------------

### महाराष्ट्रात जोरदार

जिल्ह्यातील काही भागांत मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः घाट परिसरात पावसाची शक्यता असून, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांदरम्यान नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्हा आणि घाट परिसरातही वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही ठिकाणी विजांचा कडकडाट, मेघगर्जना आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष ठेवावे. सातारा जिल्हा आणि घाट परिसरात तसेच सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. वादळी वारे वाहण्याची शक्यता असल्याने शेतकरी आणि नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. उष्णतेचा सामना करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातही काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वादळी वारे आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहावे. पश्चिम महाराष्ट्रातील पावसाचा जोर सर्वत्र सारखा असेलच असे नाही; त्यामुळे स्थानिक हवामानाचा अंदाज तपासणे महत्त्वाचे आहे.

---------------

### नाना पाटेकर की कॅप्टन

जाणाऱ्या फ्लायदुबई विमानाचे अपहरण करण्याचा प्रयत्न हाणून पाडला होता. त्यांच्या या धाडसी कामगिरीमुळे त्यांना जागतिक स्तरावर हिरो म्हणून ओळखले जाते. दुसरीकडे, ठाकरेसेना कार्यकर्त्यांनी पद्मश्री नाना पाटेकर सेतू असे नाव देण्याची मागणी करणारा बॅनर लावला आहे. ठाकरेसेनेच्या एका शिष्टमंडळाने मुंबईच्या महापौर रितू तावडे यांची भेट घेतली आणि पुलाला नाना पाटेकर यांचे नाव देण्याची मागणी करणारे पत्र सादर केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सभागृह नेते गणेश खाणकर यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, ठाकरेसेना केवळ श्रेय मिळवण्यासाठी हा वाद निर्माण करत आहे. नाना पाटेकर हे देशातील अत्यंत प्रतिभावान अभिनेत्यांपैकी एक आहेत. मला वाटते की, एखाद्या पुलाला त्यांचे नाव देण्यापेक्षा, एखाद्या मोठ्या नाट्यगृहाला किंवा नाट्यसंकुलाला त्यांचे नाव देणे अधिक योग्य ठरेल, असे खाणकर म्हणाले. विद्याविहार रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील रामचंद्र चेंबूरकर मार्ग आणि पश्चिमेकडील (घाटकोपरमधील) लाल बहादूर शास्त्री मार्ग यांना जोडणारा हा ६५० मीटर लांबीचा, दोन पदरी पूल आहे, ज्याचे काम पूर्ण होण्यास बराच विलंब झाला होता. बीएमसीच्या माहितीनुसार, या पुलामध्ये रेल्वे रुळांच्या वर १०० मीटर लांबीचा भाग असून, पूर्वेकडील बाजूला २२० मीटर आणि पश्चिमेकडील बाजूला ३३० मीटर लांबीचे पोहोच रस्ते आहेत. या प्रकल्पात स्थानकावरील पदपथांपर्यंत जाण्यासाठी मार्ग, तसेच तिकीट खिडक्या, स्टेशन मास्तरचे कार्यालय आणि पायऱ्यांची पुनर्बांधणी यांचाही समावेश असल्याचे महानगरपालिकेने सांगितले.

---------

### दुष्काळाकडे संधी म्हणून बघा,

असताना तो विभाग उद्योजक म्हणून बघावे असे ठरले होते. आपण ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय करायचे ठरवले तर त्याच्यात खूप संधी आहे. गाई घ्याव्या लागतील, पाणी लागेल असा प्रश्न आहे, हायड्रोपोनिक्स म्हणजे घटस्थापनेपेक्षा वेगळे काही नाही. फक्त शेतकऱ्याला समजून सांगण्याची गरज आहे. जेवढे पाणी तुळशीला लागते तितके त्या हायड्रोपॉनिक्सला लागते, त्यापेक्षा जास्त नाही. ते केले तर त्यात प्रोटिन अधिक मिळते, उत्पादन वाढते. कमी पाण्यात दुग्ध व्यवसाय करु शकतो, शुद्ध दूध असेल तर त्याला मागणी आहे, दुग्ध आधारित उद्योग करता येतात, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली. दुष्काळावर उपाय पाणी अडवा पाणी जिरवा हाच आहे. तुमच्या गावातील पाणी गावात राहिले पाहिजे हा सर्वात मोठा असेट आहे. दरवर्षी ३०० मिलीमीटर पाणी, ४०० मिलीलीटर, ५००-१००० मिलीलीटर पाऊस जिथे जिथे पडतो,ते पाणी कुठे जाते. ते पाणी जाऊ देतो कारण ५ फूट बांध होता तो आता एक फूट नाहीये. बांध कोरुन टाकला त्यामुळे पाणी शेतात थांबत नाही, ते पाणी वाहत नदीला जाते, तिथून तळ्यात गेले. तुम्हाला निसर्गाने दिलेले पाणी वाया घालवता आणि नंतर विकत घेता, असे तुकाराम मुंढे म्हणाले. एका शेतकऱ्याने नव्हे गावांच्या गावांनी मिळून बांधबंधिस्ती हा एकमेव कार्यक्रम केला तरी पुढच्या वर्षी ३०० मिलीलीटर पाऊस पडला तरी तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही. आपल्याकडे हिवरेबाजारचे उदाहरण आहे, याही परिस्थितीत त्या गावात करोडपती शेतकरी आहेत. कारण पाणी आडवलंय, त्या पाण्याचा योग्य पद्धतीने पीक पद्धतीत वापर केला आहे, असे तुकाराम मुंढे यांनी म्हटले. उद्योजकांनी सीएसआरच्या माध्यमातून बांधबंधिस्तीचे काम हाती घ्यावे, मी त्यात पहिल्यांदा सहभागी होईन, असेही तुकाराम मुंढे म्हणाले.

---------------

### गोकुळसाठी आज

गेलेली मजल या सर्व पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची निवडणूक अक्षरशः ढवळून निघाली आहे. यासाठी रविवारी (१८ ऑक्टोबर) या मतदान होत आहे. जिल्ह्यातील ३५ केंद्रांवरती गोकुळसाठी मतदान होणार आहे. मतमोजणी दुसऱ्याच दिवशी सोमवारी होणार आहे. या घनघोर लढाईमध्ये कोण बाजी मारणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. गोकुळच्या निवडणुकीसाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. गोकुळच्या २५ जागांसाठी ही निवडणूक होत आहे तर त्यासाठी पात्र ठरावधारक ५,४१८ संस्था आहेत. करवीर तालुक्यामध्ये सर्वाधिक चुरस आहे. करवीर तालुक्यामध्येच सर्वाधिक पाच केंद्रांवरती मतदान होणार आहे. दुसरीकडे महायुतीकडून तसेच काँग्रेस प्रणीत राजर्षी शाहू शेतकरी विकास आघाडीकडून ठरावधारकांना सहलीवरती पाठवण्यात आले होते. हे ठरावधारक सहलीवरून आज परतणार आहेत. त्यांना थेट मतदान केंद्रांवर नेले जाणार आहे. दरम्यान कोणत्याही स्थितीत मते ही बाद ठरू नयेत यासाठी सुद्धा दोन्ही बाजूकडून विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. एक जरी शिक्का खराब झाला तरी मतपत्रिका अवैध ठरणार आहे, त्यामुळे मतदारांना ट्रेनिंग सुद्धा दिले गेले आहे.

-----------

### सत्ता सोडण्याची हीच योग्य

टीका केली होती. दिल्लीत कथित निवडणूक अनियमिततेविरोधात सुरू असलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंग यांनी आरोप केला की, हे लोक बांगलादेशच्या धर्तीवर सत्ता परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत आणि तरुणांच्या ऊर्जेचा वापर करून 'अराजकता' पसरवत आहेत. लोकशाहीत कोणालाही गोंधळ निर्माण करण्याचा किंवा घटनात्मक संस्थांची विश्वासार्हता कमी करण्याचा परवाना मिळालेला नाही. त्यावर सिब्बल म्हणाले, राजनाथ सिंगजी तुमचा आरोप आहे की काँग्रेसला बांगलादेशच्या धर्तीवर सत्ता परिवर्तन घडवून आणायचे आहे. तर तसे नाही, जनताच सत्ता परिवर्तन करु इच्छिते. इंडिया अगेन्स्ट करप्शन (भ्रष्टाचाराविरुद्ध भारत) या घोषणेसह झालेल्या आंदोलनांमुळेच तुम्ही सत्तेत आला होतात. त्यानंतर, तुम्ही स्वतःच भ्रष्टाचाराला जवळ केले, संस्थांवर ताबा मिळवला आणि मतदार याद्यांमध्ये फेरफार केली. आता तुमची वेळ निरोपाची आहे, असे म्हणत त्यांनी राजनाथ सिंह यांना टोला लगावला आहे. राजनाथ सिंह यांच्या या आरोपांनंतर कपिल सिब्बल यांनी दिलेल्या प्रतिक्रियेनंतर सरकार आणि विरोधकांमधील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा समोर आला आहे.

------------

### अभिजीत दीपके

जाईल, असे दिल्ली पोलिसांनी सांगितले आहे. नवी दिल्लीतील कनॉट प्लेस येथे तिरंगा मार्च निदर्शन मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. शनिवारी दुपारी त्यांना मंदिर मार्ग पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. दिल्ली पोलिसांनी सांगितले की, 'दिल्ली पोलीस कायदा' च्या कलम ६५ अंतर्गत अभिजीत दीपके यांना ताब्यात घेण्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यानंतर 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' च्या कलम १२६ आणि १७० अन्वये शांतता भंग केल्याप्रकरणी त्यांना अटक करण्यात आली होती. अटकेनंतर त्यांना त्याला 'विशेष कार्यकारी दंडाधिकारी' यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्याला अटींसह जामीन मंजूर करण्यात आला. या घटनेच्या आधी, १० ऑक्टोबर रोजी जेव्हा दीपकेला दिल्ली विमानतळावर ताब्यात घेण्यात आले होते, तेव्हाही त्याच्याविरुद्ध शांतता भंग केल्याप्रकरणी एक स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावेळी, त्याला एक वर्षाच्या कालावधीसाठी शांतता राखण्याचे आश्वासन देणाऱ्या बंधपत्रावर स्वाक्षरी करायला लावली होती. दीपकेसोबतच दिल्ली पोलिसांनी नेहा बोरा हिलाही ताब्यात घेतले होते, मात्र नंतर तिची सुटका करण्यात आली होती. दरम्यान, सुटकेनंतर माध्यमांशी बोलताना नेहा बोरा म्हणाल्या की, मला मंडी हाऊस येथून ताब्यात घेण्यात आले आणि पहाटे ५:०० वाजेपर्यंत (पोलीस ठाण्यात) ठेवण्यात आले. पोलीस अशा प्रकारची बेकायदेशीर धरपकड का करत आहात? देशात हे दीर्घकाळापासून सुरू आहे. या आंदोलनामुळे अशा प्रकारच्या अटकेचा प्रकार समोर आला आहे. या घटना उघडकीस आल्या आहेत. पोलीस कायदा व सुव्यवस्था राखण्याचा आणि नियमांनुसार काम करण्याचा दावा करतात, परंतु प्रत्यक्षात तसे काहीही घडत नाही.

------------

### विजय झाला की म्हणतात यांनी कामच

लोकांना निवडणुका जिंकल्या की लगेच कोणाचे तरी उपकार विसरण्याची सवय असते. आम्ही कोणाचे काम केले आणि कोणाचे नाही, हे जनतेला चांगले ठाऊक आहे. स्वतः निवडून आल्यानंतर लगेच अशी विधाने करून स्वतःचे राजकीय महत्त्व वाढवण्याचा काहींचा केविलवाणा प्रयत्न असतो. मात्र, आपण अशा टीकेकडे लक्ष न देता कामावर विश्वास ठेवतो. पंकजा मुंडेंच्या या वक्तव्यानंतर उपस्थितांमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. सुरेश धस यांनी विजयानंतर थेट पंकजा मुंडेंवर निशाणा साधला होता आणि आता पंकजा मुंडे यांनी महायुतीच्या प्रचार मंचावरून धस यांना थेट प्रत्युत्तर दिल्याने बीड जिल्ह्यातील भाजप व महायुतीमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पंकजा मुंडेंच्या या अप्रत्यक्ष इशाऱ्याला आता आमदार सुरेश धस काय प्रत्युत्तर देतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. पंकजा मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्याचे आवाहन केले असले तरी सध्याची जिल्ह्यातील आणि राज्यातील मराठवाड्यातील परिस्थिती पाहता भाजप आणि शिवसेनेचे पदवीधर मतदार त्यांना स्वीकारतील का हा मोठा प्रश्न आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६


## थोडक्यात

### बीडच्या ओंकार पारवेची झेप : नीट यूजी २०२६ मध्ये घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी




नीट यूजी २०२६ या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत उत्तम गुण संपादन करत चौसाळा येथील सुपुत्राने घवघवीत यश मिळवले आहे. ओंकार लक्ष्मण पारवे याने या परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करत देशातील सर्वोच्च दंत महाविद्यालयांपैकी एक असलेल्या शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे प्रवेश मिळवला आहे. शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशपातळीवर सर्वोच्च कामगिरी करणारे आणि सर्वाधिक मागणी असलेले महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. या महाविद्यालयात प्रवेश मिळणे हे प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्याचे स्वप्न असते. ओंकारच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे. त्याच्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाचे हे फळ आहे. या यशस्वी वाटचालीसाठी ओंकारचे आई-वडील , शिक्षकवृंद आणि मित्रपरिवाराचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ओंकारच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

### मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी -डॉ. कमलकिशोर लड्डा



माजलगाव । प्रतिनिधी

मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी असे प्रतिपादन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवस सर्व भारतभर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. परंतु हल्लीच्या काळामध्ये मल्टिमीडियाच्या जमान्यात मोबाईल वापरावर सर्वात जास्त भर ही युवा पिढी देत आहे. त्यामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. त्यामुळे डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासायला हवी असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी म्हणाले की, आजच्या काळामध्ये आपण पाहतो की, ग्रंथालयामध्ये विद्यार्थी न दिसून येता दिवसभर मोबाईलच्या वेडामध्ये अडकून पडला आहे. यापासून युवा पिढीला जर वाचवायचे असेल तर वाचन संस्कृती ही अनमोल आहे आणि तीच संस्कृती आपले आयुष्य वाचवू शकते असे ते म्हणाले. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.सुरेश बनसोडे यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.संजीव गायकवाड यांनी केले तर आभार डॉ.रमेश गटकळ यांनी मानले.या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होत्रा,डॉ. युवराज मुळये,प्रा. अंकुश सावळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री,प्रा. अशोक होके, सुरेश गांडगे, तसेच ग्रंथालय विभागातील कर्मचारी सुरेश निवडुंगे, व महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### वसतीगृह, आधार आणि स्वयंम योजनेसाठी ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज करावेत

बीड :- जिल्ह्यातील इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीमध्ये येत असलेल्या तांत्रिक अडचणींमुळे शासनस्तरावरून मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी दि. ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत आपले अर्ज ऑफलाईन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता बारावी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचे अर्ज आता ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. या मुदतवाढीमुळे जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, ऑनलाईन फॉर्म भरण्यापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ स्वयंम योजनेचा भटक्या जमाती क प्रवर्गासाठी लाभ घेता येणार आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जिल्हाधिकारी आणि शाळकरी मुलांच्या दिलखुलास गप्पा: बीडच्या उज्वल भविष्याची एक सकारात्मक नांदी

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन नुकतेच एका अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक कार्यक्रमाने गजबजून गेले होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी जिल्ह्यात 'कलेक्टरशी गप्पा' हा एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोतन (तालुका पाटोदा) येथील ३० शाळकरी मुलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकृष्ण इघारे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी जीवन राजपूत उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजुम, विस्तार अधिकारी श्री.पल्लेवाड, शिक्षक राहुल डोंगर उपस्थित होत्या.

या संवादातून प्रशासकीय अधिकारी आणि सामान्य विद्यार्थी यांच्यातील दरी कमी होऊन एक अतिशय सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

अपयश हीच यशाची पहिली पायरी: जिल्हाधिकाऱ्यांचा प्रवास

या गप्पागोष्टींमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:चा जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. लहानपणी आयएएस (ख-ड) होण्याचे आपले कोणतेही स्वप्न नव्हते, असे त्यांनी प्रांजळपणे सांगितले. २०१० मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर त्यांनी यूपीएससीची (णझडउ) तयारी सुरू केली. पहिल्या प्रयत्नात अपेक्षित यश मिळाले नाही, परंतु तरीही त्यांनी जिद्द सोडली नाही. सुरुवातीला त्यांची भारतीय महसूल सेवेत (खठड - कस्टम्स आणि जीएसटी) निवड झाली आणि त्यानंतरच्या प्रयत्नात ते आयएएस झाले. कोणतीही गोष्ट पहिल्या प्रयत्नात मिळेलच असे नाही, त्यामुळे नेहमी दुसरा पर्याय (Plan B) तयार ठेवावा



आणि सातत्याने प्रयत्न करत राहावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**बीडचे भविष्य तुमच्याच हाती!**

जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास जगताना म्हणाले की. तुम्हीच बीडचे भविष्य आहात, त्यामुळे बीडचा विकास आणि सकारात्मक बदल तुमच्यावरच अवलंबून आहे, अशी प्रेरणा त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत; मग ते प्रशासकीय अधिकारी होण्याचे असो, डॉक्टर होण्याचे असो, व्यवसाय करण्याचे असो किंवा नासा (N-S-) आणि इस्रोसारख्या (ISRO) संस्थांमध्ये जाण्याचे असो. यश मिळवण्यासाठी आत्मविश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे, हे त्यांनी अधोरेखित केले.

दुष्काळ, शेती आणि पर्यावरण: मुलांचे अभ्यासपूर्ण प्रश्न

या गप्पांमध्ये विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी सर्वांनाच थक्क केले. बीडमधील दुष्काळ आणि शेतीच्या समस्यांवर मुलांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना प्रश्न विचारले. यावर उत्तर देताना जिल्हाधिकाऱ्यांनी एल निनो (एश्र छळपे) प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कसे कमी झाले आहे हे समजावून सांगितले. तसेच, कमी पाण्यात आणि कमी वेळेत येणाऱ्या सोयाबीन पिकाकडे शेतकऱ्यांचा कल का वाढला आहे, यावरही चर्चा केली. जनावरांच्या चाऱ्याची टंचाई दूर करण्यासाठी हायड्रोपोनिक्स (कूर्वोपिळली) आणि सुका चारा (ऊू षेववशी) यांसारखे आधुनिक पर्याय कसे वापरता येतील, याची माहिती त्यांनी दिली. त्याचबरोबर रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देत, पुढच्या पावसाळ्यात प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.

विकासाची नवी स्वप्ने आणि शिस्त

बीड जिल्ह्याच्या विकासाबद्दल बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, बीडमध्ये रेल्वे सेवा सुरू झाली. आहे आणि विद्यार्थ्यांसाठी एक तारांगण (झश्ररपशींरीळीा) देखील उभारले जात आहे. याचबरोबर त्यांनी नागरिकत्वाची जबाबदारी आणि शिस्तीचे महत्त्व मुलांना समजावून सांगितले. ट्रॅफिक नियमांचे पालन करणे, हेल्मेट वापरणे या सवयी लहानपणापासूनच कशा अंगीकारल्या पाहिजेत, यासाठी त्यांनी केरळ आणि इतर देशांतील उदाहरणे दिली.

'कलेक्टरशी गप्पा' हा उपक्रम केवळ एका अधिकाऱ्याचा विद्यार्थ्यांसोबतचा संवाद नव्हता, तर ती बीडच्या उज्ज्वल भविष्याची पेरणी होती. एका सर्वोच्च पदावर बसलेल्या अधिकाऱ्याने अत्यंत साधेपणाने आणि मित्रत्वाने मुलांच्या मनात ज्ञानाची, आत्मविश्वासाची आणि जिद्दीची ज्योत पेटवली.

## शाळेची सुधारणा करण्यासाठी सहकार्य करणार: मारोती गोंडे

### चिंचोटी जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापण समितीचा सत्कार संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील नूतन शालेय व्यवस्थापन समितीची निवड झाल्यानंतर शाळेच्या वतीने अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य गावातील पदाधिकारी यांचा शाल श्रीफळ हार देऊन यथोचित सत्कार सत्कार सोहळा पार पडला.शाळा सुधारण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आम्ही तन-मन-धनाने सहकार्य करणारा असल्याचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारुती गोंडे यांनी सांगितले.

. चिंचोटी जिल्हा परिषद शाळेचा शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकाल संपल्यानंतर शाळेच्या वतीने छोट्या खाणी निवडणूक पार पडली या मध्ये नूतन अध्यक्ष म्हणून मारुती अण्णा गोंडे,यांची निवड झाली तर उपाध्यक्ष म्हणून गोरख माने यांची निवड करण्यात आली.या या सत्कार सोहळ्याचे प्रस्तावित रामप्रसाद शेंडगे सर यांनी केले ते म्हणाले की,विद्यार्थी चांगले घडवण्यासाठी शाळेचे शिक्षक व पालक हा महत्त्वाचा दुवा आहे.त्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यावर चांगले सुसंस्कार दर्जेदार शिक्षण व गुणवत्तेसाठी आम्हाला आपल्या कडुन वेळोवेळी लागणारी गरज अपेक्षा असतात ते सहकार्य लाभले तर आपले विद्यार्थी चांगले उच्च पदावर जाऊ




शकतात जेणेकरून आपल्या गावाचं विद्यार्थ्याचं पालकाचं नावही रोषण होते.आपल्या अध्यक्षीय भाषणात मारुती गोंडे म्हणाले की आपल्याला आपल्या शाळेसाठी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी तुम्ही आम्हाला कधीही हाक द्या तेथे आम्ही सर्व जन मदत सहकार्य नक्कीच करु अशी त्यांनी ग्वाही दिली.यावेळी पत्रकार रामेश्वर गोंडे, महादेव उजगरे,सुमंत मुन्ना गोंडे,आशिष इंगळे सर,यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शालेय व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून दत्तात्रेय गोंडे,रोहिणी सुमंत गोंडे,सिता बाळनाथ गोंडे,उर्मिला साहेबराव गोंडे,दीक्षा शिवकुमार काकडे,सोनाली कानोबा जावळे,अश्विनी सतीश गोंडे, गोविंद शिवजी गोंडे,आयोध्या आश्रुबा लंगे,दिपक विलास काकडे,संजय रामप्रसाद गोंडे यांचा ही सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला.कार्यक्रमास पत्रकार अशोक फपाळ,सरपंच भागवत गोंडे सरपंच गोविंद गोंडे ग्राप सदस्य केशव बापू गोंडे, साहेबराव गोंडे,नाना काकडे,दत्ता पाटील गोंडे,अशोक गोंडे केशव गोंडे, सुमंत(मुन्ना)गोंडे,अक्षय गोंडे,नवनाथ गोंडे, राधाकिसन गोंडे,निवृत्ती गोंडे,मोहन बादाडे,सुधाकर गोंडे,महादेव उजगरे,कार्यक्रमाची तयारी मुख्याध्यापक तात्याराव गडदे सर,रामप्रसाद शेंडगे सर,नितीन कांबळे सर, आशिष इंगळे सर, रमेश भोज सर,रवींद्र काळेसर,अनिता दिव्य मॅडम यांनी केली.

पान ६ वरुन...

### तांदळवाडी घाट

उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या प्रशासकीय मार्गदर्शनाखाली पाणीसंवर्धन आणि उपलब्ध पाणीसाठ्याच्या संरक्षणाला महत्त्व दिले जात आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना दिलेल्या सूचना

- पिण्याचे पाणी आवश्यकतेनुसारच वापरावे आणि नळ सुरू ठेवून पाण्याचा अपव्यय करू नये.- घरातील नळ , टाक्या व पाण्याच्या पाइपमधील गळती तातडीने दुरुस्त करावी.- वाहन धुणे , अंगण स्वच्छ करणे आणि इतर कामांसाठी अनावश्यक पाणी वापरणे टाळावे.- तलाव , विहिरी व सार्वजनिक पाणीस्रोतांमधील पाणीसाठा जपावा आणि अवैध पाणीउपसा निदर्शनास आल्यास प्रशासनाला कळवावे.- पाणीटंचाईच्या काळात नागरिकांनी परस्पर सहकार्य करून पाण्याचा जबाबदारीने वापर करावा. पाणी ही सामूहिक जबाबदारी आहे . आज पाण्याची बचत केली , तरच उद्याची गरज भागवता येईल . प्रत्येक नागरिकाने पाण्याचा प्रत्येक थेंब जपावा आणि पाणीसंवर्धनासाठी प्रशासनाला सहकार्य करावे , असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

### जयमहेश साखर कारखान्याचा

जास्त भाव देत जयहेश शुगर इंडस्ट्रीजने यावर्षी गाळपास येणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ३,१२१ रुपये एक रक्कमी भाव जाहीर करण्यात आला आहे.यामुळे दुष्काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफ आर पी पेक्षा ३३१ रुपये प्रति टन भाव जास्त दिला आहे.या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावर्षी जयमहेश शुगर इंडस्ट्रीज (एन एस एल) कारखाना कार्यक्षेत्रात पडलेल्या दुष्काळामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासत या वर्षी कारखान्याला २७९० रुपये प्रतिटन एफ आर पी बसत असताना सुद्धा शेतकऱ्यांच्या हितासाठी जयमहेश प्रशासनाने एफ आर पी पेक्षा ३३१ रु प्रतीटन जास्त भाव देण्याचा निर्णय घेतला असून यावर्षी जयमहेश कारखान्याला गाळपासाठी येणाऱ्या ऊससाठी ३१२१ प्रतिटन भाव एक रक्कमी जाहीर करण्यात आला आहे.तरी कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस जयमहेश शुगर इंडस्ट्रीज गाळपासाठी आणुन सहकार्य करावे असे आवाहन जयमहेश कारखान्याच्या प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.- पारसनाथ जैस्वाल (जनरल मॅनेजर, जयमहेश (एन एस एल)

### केंद्र सरकारकडून दुष्काळ ग्रस्तांना

वतीने बौद्ध, मातंग, चर्मकार समाज बांधवांना गायरान जमिनी मिळवून दिल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ५९ जाती एकसंघ ठेवण्यासाठी १३ टक्के आरक्षण दिले आहे. २० टक्के आरक्षणाची मागणी करणे महत्त्वाचे आहे. उपवर्गीकरणाची चळवळ अडाणी व ठगे लोकांनी सुरू केली आहे. याला मातंग समाजाचे पुढारी बळी पडले आहेत. बौद्ध समाज बांधवांनी सोशल मीडियावर काहीही करू नये. बौद्ध व मातंग समाजामध्ये कसलाही वाद निर्माण करायचा नाही. आपल्याला उपवर्गीकरण रद्द करायचे आहे. आज जर आत्माराम चांदणे आणि एकनाथ आव्हाड असते तर त्यांनी उपवर्गीकरणास विरोध केला असता.

ज्या राज्यात उपवर्गीकरण झाले त्या राज्यातील लोक अशिक्षित होते. बौद्ध समाजातील नेते, विचारवंत यांनी वाद घातला नाही. आजच्या शिक्षणाचा खर्च गोरगरिबांना परवडणारा नाही. महागाई निर्देशकांनुसार महा ५ हजार रुपये शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे. अशी आमची सभेच्या माध्यमातून सरकारकडे ठाम मागणी आहे. असे पप्पू कागदे यांनी स्पष्ट केले. यावेळी गौतम सोनवणे, बाबुराव कदम, राजा सरवदे, अविनाश महातेकर यांनी आपले विचार व्यक्त केले. या विराट जाहीर सभेस अण्णासाहेब रोकडे, मिलिंद शेळके, अड. ब्रह्मानंद चव्हाण, सिद्धार्थ कासारे, सचिन मोहिते, भास्कर रोडे, रमेश मुळे, राजू जोगदंड, मझर खान, सचिन कागदे, सुरेश माने, किसन तांगडे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, महादेव उजगरे, दीपक कांबळे,प्रमोद दासूद, शरण मस्के, अरुण भालेराव,प्रकाश जावळे, धोंडीराम सिरसाट, लक्ष्मण सिरसाट, गोवर्धन वाघमारे,महेश आठवले, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, रेश्मा जोगदंड, अरुण निकाळजे,बापू पवार, ज्ञानोबा माने, शाहू डोळस, सादिक कुरेशी, महादेव बनसोडे, उत्तम मस्के, दशरथ शिंदे,अरुण कांबळे,संभाजी गायकवाड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे, अविनाश जोगदंड,शाम वीर, भैय्या साळवे, विलास जोगदंड, महिंद्र वडमारे,मनोज बोराडे, योगेश गायकवाड, नामदेव वाघमारे,भास्कर जावळे,रतन वाघमारे, सतिष शिनगारे, रतन वाघमारे यांच्यासह हजारो महिला व कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन अड. सुरेश वडमारे व प्रा. बाळासाहेब गव्हाणे यांनी केले.

रॅलीत निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली.

या रॅलीत रिपाइं कार्यकर्त्यांनी निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन केले. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या तगड्या नियोजनातून मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरातील भव्य विराट जाहीर सभा ऐतिहासिक झाली.

### बुखारी माध्यमिक व उच्च

आणि जिद्दीचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. बारावी विज्ञान शाखेचा अभ्यास सांभाळत त्याने मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

जैदच्या यशासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य हारून सर यांचे मार्गदर्शन तसेच क्रीडा शिक्षक युसुफ इनामदार यांचे प्रशिक्षण व प्रोत्साहन लाभले.

या यशाबद्दल बुखारी एज्युकेशनल सोसायटीचे अध्यक्ष अजहर नाईक, सचिव खुर्शीद नाईक, सहसचिव इमरान नाईक तसेच बुखारी प्राथमिक उर्दू शाळेचे मुख्याध्यापक इरफान सर यांनी जैदचे अभिनंदन केले व त्याच्या पुढील शैक्षणिक आणि क्रीडा वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. जैदच्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक संकुलात आनंदाचे वातावरण असून, विभागीय स्पर्धेतही त्याने यश संपादन करून शाळेचा आणि माजलगावचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवस दिनी जन्मलेल्या नवजात बालकांना ड्रेस व मच्छरदाणीचे वाटप

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या नवजात बालकांना ड्रेस व मच्छरदाणीचे वाटप करण्यात आले. महात्मा फुले युवा दलाच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.



राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मंत्री जयकुमार गोरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचा निर्णय महात्मा फुले युवा दलाने घेतला होता. त्यानुसार नवजात बालकांना ड्रेस व मच्छरदाणीचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून गरजू घटकांना मदत करणे आणि समाजोपयोगी उपक्रम राबविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे

यावेळी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ड. सतीश शिंदे, डॉ संजय राऊत , बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे, पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहोळकर, रमेश भाऊ दुधाळ, गोरख आखाडे, धर्मराज दुधाळ, सुहास काळे, दीपक दुधाळ, वाघमारे ,सुधीर शिंदे आदी उपस्थित होते.

## सुवर्णकार महिला मंडळ आयोजित गौरी गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

सुवर्णकार महिला मंडळ, माजलगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गौरी गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. १६ ऑक्टोबर रोजी श्री संत नरहरी महाराज मंदिर, बाजार रोड, माजलगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडले.



या कार्यक्रमाला माजलगावकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेत अनेक महिलांनी सहभाग घेऊन आपल्या कल्पकतेने गौरी गणपतीची आकर्षक सजावट केली होती.

या कार्यक्रमावेळी सुवर्णकार महिला मंडळाच्या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. यामध्ये मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्नेहलता कुलथे, उपाध्यक्षा सौ. अरुणा टाक, कोषाध्यक्षा सौ. वैशाली टाक, सौ. गीता दहिवाळ, सौ. अनिता कुलथे, सौ. लता कुलथे, सौ. अर्चना शहाणे, सौ. रेखा सोनार, सौ. धनश्री टेहरे, सौ. पूजा मुंडकर आदी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे आयोजन सौ. योगिता बोकन, सौ. प्रियंका शहाणे, सौ. शुभांगी कुलथे यांनी केले होते.

स्पर्धेचा निकाल प्रथम क्रमांक -

सौ. माधवी सोळंके द्वितीय क्रमांक - सौ. रोहिणी थळकर तृतीय क्रमांक - सौ. सुप्रिया मालानी

उत्तेजनार्थ - सौ. मनीषा भुतडा, सौ. शितल शिंदे, सौ. मनीषा डुकरे, सौ. ऋतुजा कुलथे, सौ. चंदा भुतडा विजेत्या स्पर्धकांना सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सर्व महिला सदस्यांनी परिश्रम घेतले.

## महादेवानंद भारती महाराज यांनी नवरात्रीनिमित्त सुरु केलेल्या अंमळनेर येथील चौथ्या फिरता नवरात्र महिला सप्ताहाला हजारो भाविकांचा जनसागर लोटला!

### किर्तन,प्रवचन,अन्नदान,गरबा कार्यक्रमाने रेणुकामाता परिसर भक्तीरसात न्हावून निघाला

पिंपळवंडी । प्रतिनिधी

अश्वत्थलिंग संस्थानचे मठाधिपती महादेवानंद भारती महाराज यांनी नवरात्रीनिमित्त चार वर्षापुर्वी सुरु केलेल्या रेणुकामाता नवरात्र महिला अखंड हरिनाम सप्ताहाच्या चौथ्या अंमळनेर येथील सप्ताहाला परिसरातील भाविकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत हजारो महिला आणि भाविक-भक्तगण किर्तन,प्रवचन,अन्नदान,गरबा कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली असुन विद्युत रोषणाई भाविकांना मोहनी घालीत आहे.अंमळनेरचा रेणुकामाता परिसर अक्षरक्ष: भक्तिरसात नाहुन निघाल्याचे चित्र दिसून येत आहे.

रविवार दि.११ ते सोमवार दि.१९ ऑक्टोबर असा ९ दिवसाचा हा महिला सप्ताह आयोजित केला असुन ह.भ.प.मिनाताई मडके,ह.भ.प.संगिताताई सोळसकर,ह.भ. प.ज्ञानेश्वरीताई जगताप,ह.भ.प. वैष्णवीताई वडधने,ह.भ.प. यमुनाताई पवार,ह.भ.प. उर्मिलाताई वनारसे,ह.भ.प.साधवी सुवर्णानंद यांची प्रवचने आणि किर्तने संपन्न झाली आहेत.या धार्मिक सोहळ्याला परिसरातील महिला आणि भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवित कार्यक्रमाचा तर सकाळी नाष्टा दुपारी आणि सायंकाळी पंगतीचा आस्वाद घेत आहेत.रात्री महिला



भगिणी गरबा धरीत टिपर्यांचा आनंद लुटत आहेत.ह.भ.प. महादेवाननंद भारती महाराज यांचे अध्यात्मिक विचार देखील ऐकायला मिळत आहेत.

मुस्लिम बांधवांकडुन सप्ताहाला नाष्टा

येथील सप्ताहामध्ये हिंदू बरोबरच मुस्लिम बांधव देखील हिरिरेने सहभाग नोंदवीत असुन सप्ताह सुरु झाल्यापासुन पंगतीत आणि धार्मिक कार्यक्रमात झोकुन दिलेले दिसत आहेत.गावातील मुस्लिम बांधवानी एकत्र येत सप्ताहाला एक दिवसाचा नाष्टा देऊन हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश दिला आहे. या विशेष उपक्रमाचे ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांनी कौतुक करुन या सर्व मुस्लीम बांधवांचा सत्कार केला तर मुस्लीम बांधवानी देखील महाराजांचे स्वागत केले.या प्रसंगी रौफ तांबोळी,इम्रान पठाण,समिर बागवान,मुन्ना सय्यद,अमन सय्यद, सलीम सय्यद,सलमान आतार, अमीर इनामदार,मोसीम बागवान, तोफीक बागवान,बबलु बागवान, आदि उपस्थित होते.मुस्लिम सणाला देखील येथील हिंदू बांधव सहभागी होऊन ईफ्तार पार्टी देत असतात.तर सैदबादशहाची यात्रा देखील हिंदू-मुस्लिम बांधव एकत्रितपणे साजरी करतात.

पुढील पाचवा सप्ताह पिंपळवंडीत-महादेवानंद भारती महाराज जवळागिरी,भडकेल,कोतन आणि अंमळनेर नंतर

गेल्या चार वर्षापासून सुरु असलेला पाचवा महिला नवरात्री महोत्सव पुढील वर्षी पिंपळवंडी येथील कुंभार दऱ्यातील रेणुका मंदिरात होईल असे महादेवानंद भारती महाराज यांनी यावेळी जाहीर केले.

कल्याण स्वामी वारकरी संस्थेच्या १०१ मुलींची प्रमुख उपस्थिती

नवरात्री महिला सप्ताहात सर्व किर्तन,प्रवचन हे फक्त महिलांचीच असून चकलंबा येथील कल्याणस्वामी संस्थानच्या १०१ मुली टाळकरी,गायन,मृदंग,वादक, हरिपाठ,हार्मोनियम अशा भुमिका पार पाडीत आहेत.एका पोषाखात असलेल्या मुली या कार्यक्रमांचे आकर्षण ठरत आहेत.

# रब्बी हंगामासाठी बियाणे अनुदानाचे अर्ज सुरू; हरभरा, मसूर उत्पादकांना लाभाची संधी

पुणे / प्रतिनिधी

रब्बी हंगाम २०२६-२७ साठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महाडीबीटी शेतकरी पोर्टलवर प्रमाणित बियाणे आणि बियाणे संच अर्थात मिनी किट वाटपासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कमी खर्चात उच्च दर्जाचे आणि सुधारित वाणांचे बियाणे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना विविध पिकांच्या बियाण्यांसाठी १०० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळू शकते.

योजनेअंतर्गत पात्र तालुक्यांतील शेतकऱ्यांना विविध पिकांचे बियाणे मिनी किटच्या स्वरूपात वितरित केले जाणार आहे. काही विशिष्ट घटकांमध्ये हे मिनी किट पूर्णपणे मोफत दिले जातात. तसेच हरभरा आणि मसूर या पिकांच्या प्रमाणित बियाण्यांसाठी ७५ ते १०० टक्क्यांपर्यंत अनुदानाची तरतूद आहे. हरभऱ्याच्या पाच वर्षांच्या आतील सुधारित वाणांसाठी प्रति क्विंटल सहा हजार रुपये, तर इतर जुन्या वाणांसाठी प्रति क्विंटल चार हजार



रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. मात्र, प्रत्यक्ष अनुदानाचे स्वरूप संबंधित योजनेचे निकष आणि पात्रतेनुसार निश्चित होईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या नावावर शेतजमीन असणे आवश्यक असून, त्यासाठी सातबारा आणि आठ-अ उतारा आवश्यक आहे. याशिवाय आधार कार्ड, आधारशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक आणि अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी बँक पासबुकची माहिती उपलब्ध असणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीच्या माध्यमातून ऑनलाइन पडताळणी केली जाऊ शकते. अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी शेतकरी पोर्टलवर जाऊन फार्मर आयडी आणि पासवर्ड किंवा आधार क्रमांक व ओटीपीच्या मदतीने लॉगिन करावे. त्यानंतर शेतकरी प्रोफाईल १०० टक्के पूर्ण असल्याची खात्री करून मुख्य मेनूमधील 'घटकासाठी अर्ज करा' हा पर्याय निवडावा. पुढे 'बियाणे वितरण, प्रात्यक्षिके, औषधे व खते' या विभागात जाऊन 'बियाणे वितरण' हा घटक निवडून ऑनलाइन अर्ज भरता येईल.

योजनेसाठी उपलब्ध असलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लाभार्थ्यांची निवड ई-लॉटरी पद्धतीने केली जाऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी अर्ज भरताना आवश्यक कागदपत्रे आणि माहिती अचूक नोंदवावी. अर्ज करण्यापूर्वी महाडीबीटी पोर्टलवर संबंधित पिकासाठी उपलब्ध असलेले अनुदान, पात्रतेचे निकष आणि अर्जाची सद्यस्थिती तपासून घ्यावी.

# केळीतील कंद पोखरणाऱ्या सोंड किडीचे नियंत्रण



केळीमध्ये कंद पोखरणाऱ्या सोंड किडीमुळे (कॉस्मोपॉलिटस सॉर्डिकस) झाडे कोलमडून पडून झाडांची संख्या कमी होते. या भुंग्याची अळी कंदामध्ये राहून केळीचे कंद पोखरून आतील भाग खाते. कंदामध्ये पोखरत उभे-आडवे बोगदे तयार करते. त्यामुळे कंदातील उती कुजतात व कंद सडतो. या बोगद्यांचे प्रमाण वाढल्यास मुळांपासून मिळणारे अन्नद्रव्य मिळण्यात अडचणी येतात. केळीचा जोम कमी होऊन झाड मरते. किंवा जमिनीच्या पृष्ठभागापासून कोलमडून पडते.

नियंत्रण आणि उपाय : शेतातील धसकटे व इतर पालापाचोळा वेचून जाळून टाकावा किंवा जमिनीत गाडून टाकून शेत स्वच्छ करून घ्यावे. लागवडीसाठी निरोगी, कीडमुक्त कंदाची निवड करावी. कंद स्वच्छ पाण्याने धुऊन क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) २५ मिली + कार्बन्डाझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लागवड करावी. निबोळी पेंड ५०० ग्रॅम प्रतिझाड या प्रमाणात जमिनीत मिसळून घ्यावे. कार्बोफ्युरानची २० ग्रॅम भुकटी प्रतिझाड तिसऱ्या, पाचव्या व सातव्या महिन्यात जमिनीत मिसळून द्यावी. सापळा : प्रौढ भुंगेरे व अळ्यांना आकर्षित करण्यासाठी काढणी झालेल्या झाडाच्या ताज्या कापलेल्या खुंटावर कंदाची तबकडी वा खोडाचा तुकडा ठेवावा. दोन दिवसांनंतर हे सापळे त्यात जमा झालेल्या भुंगेऱ्यांसहित नष्ट करावेत. सर्वेक्षणासाठी ३० सें.मी. आकाराच्या बुंध्यांचे सापळे १० ते १५ प्रति एकरी या प्रमाणात वापर करावा. कंद पोखरणाऱ्या भुंग्याचा अधिक प्रादुर्भाव असल्यास सापळ्यांचे प्रमाण वाढवावे. जैविक कीड नियंत्रणासाठी बिव्हेरिया बॅसियाना या बुरशीचा किंवा हेटेकोह्याबिटीस इंडिका या सूत्रकृमीचा प्रतिसापळ्यावर २० ग्रॅम या प्रमाणात वापर करावा. हे सापळे झाडांच्या बुडाशी जमिनीवर ठेवावेत. कासमिल्यूर वापरलेल्या कामगंध सापळ्याचा प्रतिहेक्टरी ५ या प्रमाणात वापर करावा.

या कामगंध सापळ्याची जागा प्रत्येक महिन्यात बदलावी. या किडीचा बागेत अधिक प्रादुर्भाव असल्यास खोडवा पीक टाळावे. तसेच प्रादुर्भाव कमी प्रमाणात असल्यास खोडवा पीक घेताना पूर्वीच्या कापलेल्या बुंध्यांवर क्लोरपायरीफॉम २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वापर करावा.

फण्या ठेवण्याचे सर्वसाधारण सूत्र : झाडाच्या बुंधा/ पेंधा चा खालून गुठलीच्या वर घेर मोजणे( इंचामध्ये) म्हणजे जमिनीपासून साधारण ५ -७ सेमी उंचीवर किती इंचाचा घेर/जाडी आहे, त्याला ४ ने भाग घ्यायचा, जेवढे उत्तर येईल तेवढया फण्या ठेवाव्यात.उदा. बुंध्याचा घेर= ४ इंच असेल तर ४ बाय ४= १ फण्या ठेवणे. याप्रमाणे बारीक झाड २४ इंचाचे असेल तर ६ फण्या ठेवणे.

# फुलांची शेती करताना अशी घ्या काळजी

फुलांची शेती हा अत्यंत फायदेशीर परंतु तितकाच संवेदनशील व्यवसाय आहे. फुलांची गुणवत्ता, रंग आणि ताजेपणा यावरच बाजारभाव अवलंबून असतो. त्यामुळे फुलांची शेती करताना खालील प्रमुख बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे:

जमिनीची व हवामानाची निवड :योग्य जमीन: फुलांच्या शेतीसाठी चांगला निचरा होणारी, हलकी ते मध्यम आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन निवडावी. जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ दरम्यान असावा. हवामान: तुम्ही निवडलेल्या फुलांच्या वाणानुसार (उदा. गुलाब, झेंडू, शेवंती, जर्बेरा) योग्य हवामान निवडा. अति उष्णता किंवा अति थंडी फुलांच्या वाढीवर परिणाम करते.

सुधारित वाण आणि रोपांची निवड :बाजारात मागणी असलेल्या आणि कीड-रोगांना बळी न पडणाऱ्या सुधारित/संकरित जातींच्या बियाण्यांची किंवा रोपांची निवड करा. अधिक उत्पादन व उत्तम गुणवत्तेसाठी शक्य असल्यास पॉलीहाऊस किंवा शेडनेट तंत्रज्ञानाचा वापर करा.

पाणी आणि खत व्यवस्थापन :पाण्याचा निचरा: फुलांच्या झाडांच्या मुळाशी पाणी साचून राहू नये, अन्यथा मुळकूज होऊन झाडे वाळतात. ठिबक सिंचन: फुलांसाठी ठिबक सिंचन सर्वोत्तम ठरते, ज्यामुळे पाण्यासोबतच विद्राव्य खते थेट मुळांपर्यंत पोहोचवता येतात. संतुलित खते: नत्र, स्फुरद, आणि पालाश यांच्यासोबतच सूक्ष्म अन्नद्रव्यांची वेळेवर मात्रा द्यावी, ज्यामुळे फुलांचा रंग आणि आकार चांगला राहतो.

कीड व रोग नियंत्रण :फुलांवर प्रामुख्याने मावा, तुडतुडे, फुलकिडे आणि कोळी यांचा प्रादुर्भाव होतो. तसेच केवडा, तांबरा आणि भुरी यांसारखे बुरशीजन्य रोग येतात.

यासाठी नियमित पाहणी करून जैविक किंवा शिफारस केलेल्या रासायनिक कीटकनाशकांची वेळेवर फवारणी करावी. एकात्मिक कीड व्यवस्थापन चा वापर करा (उदा. पिवळे/निळे चिकट सापळे).

छाटणी आणि निगा :झाडांची छाटणी: गुलाबासारख्या पिकांमध्ये योग्य वेळी छाटणी करणे गरजेचे असते, ज्यामुळे नवीन फुटवे येऊन फुलांची संख्या वाढते. कळ्या तोडणे: झाडाची रचना पसरट होण्यासाठी आणि फुलांचा आकार मोठा मिळण्यासाठी सुरुवातीच्या कळ्या खुडणे आवश्यक असते.

काढणी आणि बाजारपेठ व्यवस्थापन : काढणीची वेळ: फुलांची काढणी नेहमी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी सूर्योदयानंतर/सूर्यास्ताच्या वेळी करावी. कडक उन्हात काढणी करू नये. हँडलिंग आणि पॅकिंग: काढणीनंतर फुले लगेच थंड व सावलीच्या ठिकाणी ठेवावीत. वाहतुकीदरम्यान फुले खराब होणार नाहीत अशा प्रकारे योग्य ग्रेडिंग आणि पॅकिंग (उदा. प्लास्टिक किंवा कागदी बॉक्स) करावे. पूर्व-नियोजन: फुलांचे आयुष्य कमी असल्याने स्थानिक बाजारपेठ, फुल विक्रेते किंवा व्यापारी यांच्याशी आधीच संपर्क साधून विक्रीचे नियोजन तयार ठेवावे.



# हरभरा लागवड करायची असेल तर ही माहिती वाचा

दुष्काळी परिस्थितीत ज्यांच्या जमिनीत ओलावा आणि किमान एक संरक्षित सिंचनाची सोय आहे, अशा शेतकऱ्यांसाठी हरभरा पिकाची लागवड फायद्याची ठरु शकते. परंतु यंदा कमी कालावधीचे वाण निवडणे, योग्य बीजप्रक्रिया करणे, खत व्यवस्थापन करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाण्याचे काटेकोर नियोजन करणे गरजेचे आहे. हरभरा हे रब्बीतील महत्त्वाचे पीक. हरभऱ्याची लागवड १ ते १५ ऑक्टोबरच्या दरम्यानच केली जाते. परंतु यंदाचे हवामान नेहमी सारखे नाही. त्यात खरीप हंगामाला यंदा उशीर झाला. त्यामुळे खरीपाचे पीक काढले की लगेच हरभऱ्याची पेरणी करावी. तसेच यावर्षी २० ऑक्टोबरपर्यंत शेतकरी हरभऱ्याची लागवड करु शकतात. जे बागायती क्षेत्रामध्ये पेरणी करत आहेत, अशा शेतकऱ्यांनी हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत करावी. तसेच काबुली हरभऱ्याची पेरणी पाण्याची उपलब्धता आणि सिंचनाची सोय असेल तरच करावी.

जमीन ते वाणाची निवड : हरभरा पिकासाठी मध्यम ते भारी, काळी कसदार आणि चांगला निचरा होणारी जमीन योग्य असते. पेरणीसाठी शक्यतो शेतकऱ्यांनी घरातील वाणांना प्राधान्य द्यावे फक्त हे वाण कमी कालावधीचेही असावेत. परंतु हे वाण जास्त कालावधीचे असल्यास किंवा वाणच उपलब्ध नसल्यास शेतकऱ्यांनी कमी कालावधीच्या वाणांचा वापर करावा. यामध्ये



कोरडवाहू क्षेत्रासाठी फुले विश्वराज, पीडीकेव्ही कांचन, जाकी ९२१८, तसेच बागायतीसाठी फुले विजय, फुले दिग्विजय, फुले विक्रांत, या वाणांची निवड करावी. हरभऱ्याच्या पेरणीसाठी बियाण्यांचे प्रमाण त्याच्या आकारावरुन बदलतात. मध्यम आकार- ७० ते ८० कि/हेक्टर (उदा. फुले दिग्विजय) मोठा आकार- ८० ते १०० कि/ हेक्टर (उदा. फुले विराट, बी.डी.एन.जी ७९८) टपोरा आकार- १०० ते १२५ कि/ हेक्टर (पीकेव्हा ४, फुले ०५१७)

बीजप्रक्रिया महत्त्वाची : एकसारखी आणि निरोगी उगवणीसाठी बियाण्याची बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. बुरशीजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी- ट्रायकोडर्मा-६ ग्रॅम

किंवा कार्बेंडाझिम २५ टक्के अधिक मॅन्कोझेब ५० टक्के डब्ल्यूएस ३ ग्रॅम / प्रति किलो जैविक खताची प्रक्रिया- राझोबियम आणि पीएसबी- प्रत्येकी २५० ग्रॅम / १० किलो.

पेरणी : कोरडवाहू क्षेत्र- ३० बाय १० सें.मी. बागायती क्षेत्र- ४५ बाय १० सें.मी.

आंतरपीक : आंतरपीकामुळे पिकाची जोखीम कमी होते. तीव्र हवामानात एखादे पीक हातातून गेल्यास दुसऱ्या पिकाचा आधार शेतकऱ्यांना मिळू शकतो. त्यामुळे शेतकरी हरभऱ्यासोबत रब्बी ज्वारी किंवा करडई ही पिके घेऊ शकतात. हरभरा: रब्बी ज्वारी= ६:३ हरभरा : करडई = ४:२

खत व्यवस्थापन : यंदा खतांवर फार खर्च शेतकऱ्यांनी करु नये. हा खर्च टाळण्यासाठी माती परीक्षण करुन खते दिल्यास जितकी आवश्यकता आहे तेवढेच खते देता येतात. यावर्षी शेतकऱ्यांनी २५ ते ५० टक्के रासायनिक खते कमी द्यावीत. त्याऐवजी जैविक खते, सेंद्रिय खते यांची भर घालावी. कोरडवाहू हरभरा: २० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश (सर्व मात्रा पेरणीवेळी)

बागायती हरभरा: २५ किलो नत्र,५० किलो स्फुरद आणि २५ किलो (सर्व मात्रा पेरणीवेळी) काबुली हरभरा: २५ किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश (सर्व मात्रा पेरणीवेळी)

पाण्याचे नियोजन : हरभऱ्याचे पीक जमिनीतील ओलाव्यावर वाढते. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांनी संरक्षित उपलब्ध असल्यास पिकाच्या संवदेनशील अवस्थेत पाणी द्यावे. हरभऱ्याची संवेदनशील अवस्था फुलोरा अवस्था, घाटे भरण्याची अवस्था असते. एक संरक्षित सिंचन उपलब्ध असेल तर फुलोरा अवस्थेत द्यावे. परंतु केवळ एका संरक्षित सिंचनाने पिकाच्या उत्पादनात फरक पडू शकतो. याशिवाय बागायती क्षेत्रात तुषार सिंचनाचा वापर केल्यास हरभऱ्याचे पीक चांगले उत्पादन देते.




## महत्वाच्या घटना

१२१६ : इंग्लंडचा राजा जॉन मृत्यूमुखी पडल्यामुळे त्याचा ९ वर्षाचा मुलगा हेन्री हा राजेपदी आरुढ झाला.
१७८१ : ब्रिटिश जनरल कॉर्नविलास अमेरिकेला शरण गेले, यामुळे अमेरिकन क्रांती युद्ध संपले.
१८१२ : नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोच्या सीमेवरुन माघार घेतली.
१८५३ : अमेरिकतील हवाना येथे जगातील पहिली पिठाची गिरणी सुरु करण्यात आली.
१९३३ : जर्मनी लीग ऑफ नेशन्स मधून बाहेर पडले.
१९३५ : इथिओपियावर आक्रमण केल्यामुळे राष्ट्रसंघाने इटलीवर आर्थिक निर्बंध घातले.
१९४४ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजा फिलीपाइन्सला पोचल्या.
१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द
१९९३ : पुण्याजवळील महारेडिओ दुर्बिण प्रकल्पाचे जनक आणि शास्त्रज्ञ प्रा. गोविंद स्वरुप यांना सर सी. व्ही. रामन पदक जाहीर
१९९४ : रुद्रवीणावादक उस्ताद असद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' जाहीर.
२००० : पार्श्वगायिका आशा भोसले यांना राज्यशासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान
२००५ : मानवतेविरुद्ध गुन्ह्यांसाठी सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध खटला सुरू झाला.
२०१९ : सैनिकी शाळेत मुलींनाही प्रवेश मिळण्याच्या प्रस्तावाला स्वरक्षण मंत्री यांची मंजुरी मिळाली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०२ : दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण कथालेखक. 'किशोरीचे हृदय', 'विद्या आणि वारुणी' ही कादंबरी, 'तोड ही माळ' हे नाटक व अनेक कथासंग्रह त्यांनी लिहीले. (मृत्यू: ३१ मे १९७३ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९१० : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय- अमेरिकन खगोल वैज्ञानिक. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९९५)
१९२० : पांडुरंगशास्त्री आठवले कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदि शास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २५ आक्टोबर २००३)
१९२५ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (मृत्यू: १७ एप्रिल २००१)
१९२९ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित गांधीवादी विचारधारी भारतीय समाजसेविका निर्मला देशपांडे यांचा जन्मदिन.
१९३६ : शांताराम नांदगावकर गीतकार (मृत्यू: ११ जुलै २००९)
१९५४ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १९ सप्टेंबर २००२)
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, राजकारणी आणि पंजाब राज्यातील गुरदासपूर येथील विद्यमान संसद सदस्य अजयसिंग देओल उर्फ सनी देओल यांचा जन्मदिन.
१९६१ : अजय सिंग देओल ऊर्फ 'सनी देओल' अभिनेता

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१६ : जॉन इंग्लंडचा राजा (जन्म: २४ डिसेंबर ११६६)
१७४५ : आयर्लंड देशातील निबंधकार, कवी, आणि व्यंगचित्रकार जोनाथन स्विफ्ट यांचे निधन.
१९३४ : विश्वनाथ कार ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक. १८९६ मधे त्यांनी एक छापखाना काढून 'उत्कल साहित्य' नावाचे सर्वस्वी साहित्याला वाहिलेले दर्जेदार नियतकालिक सुरू केले. (जन्म: २४ डिसेंबर १८६४)
१९३७ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ३० ऑगस्ट १८७१)
१९५० : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८८७)
१९८६ : मोझांबिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३३)
१९९५ : बाल कलाकार म्हणून पुढे आलेल्या व नंतर सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या सलमा बेग ऊर्फ 'बेबी नाझ' यांचे निधन. (जन्म:)
२००३ : बोत्सिया व हर्जेगोविना देशाचे पहिले अध्यक्ष अलिजा इझेटबेगोविच यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

# पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करा; गरज पडल्यास मी स्वत: टँकर उपलब्ध करुन देणार-रोहित पवार

जामखेड। प्रतिनिधी

कर्जत-जामखेड मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे. ज्या ठिकाणी पाणी कमी पडेल, त्या ठिकाणी मी स्वतः टँकर उपलब्ध करून देणार आहे, अशी ग्वाही आमदार रोहित पवार यांनी दिली. कर्जत-जामखेड मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी प्रांत अधिकारी यांच्याबरोबर बैठक घेतली होती. या बैठकीच्या अनुषंगाने जामखेड येथे प्रशासनासोबत दुष्काळ आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळ निवारणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पिकांचे पंचनामे, शेतकऱ्यांना मिळणारी मदत, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता, कर्जमाफी, पाणीटंचाई, टँकर सुरू करणे तसेच पानंद रस्त्यांची कामे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. दुष्काळ निवारणाची कामे अधिक वेगाने पूर्ण करावीत आणि या कामांना सर्वोच्च



प्राधान्य द्यावे, अशा सूचना आमदार पवार यांनी प्रशासनाला दिल्या.

दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. ज्या गावांमध्ये किंवा भागांमध्ये पाणीटंचाई अधिक तीव्र होईल, तेथे तातडीने उपाययोजना कराव्यात. गरज भासल्यास टँकरची व्यवस्था करण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मांडलेल्या अडचणी व समस्यांवरही चर्चा करण्यात आली. दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असून, या परिस्थितीत नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू, असा विश्वास आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला. या बैठकीला प्रांताधिकारी नितीन पाटील, जामखेडचे तहसीलदार शितलकुमार साळवे, कर्जतचे तहसीलदार रवी सातवन, डीवायएसपी सुजितकुमार क्षीरसागर, कर्जतचे गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, जामखेडचे गटविकास अधिकारी शुभम जाधव यांच्यासह नगरपंचायत व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ''फेब्रुवारी महिन्यापासून फिल्टर प्लांटसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत नगर परिषदेला सांगण्यात आले होते. तीन महिन्यांत याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, आठ महिने उलटूनही जागेचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. त्यामुळे जामखेड शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असताना उजनी वरून येणाऱ्या पाण्यासाठी फिल्टर महत्त्वाचे आहे. त्यामुळे फिल्टरला जागा मिळाली नाही तर उजनीचे पाणी जामखेड करायला कधी मिळणार. त्यामुळे येत्या १५ दिवसांत फिल्टर प्लांटसाठी जागेचा प्रश्न सोडवून कामाला गती दिली नाही, तर नगर परिषदेला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे,'' असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

# पाथर्डी जुने बस स्थानकात नागरी सुविधांचा अभाव?

## भीक मागून लोकसहभागातून बस स्थानकात नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करणार–प्रा.सुनील पाखरे

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील प्रवाशांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असणाऱ्या नवीन व जुन्या अशा दोन्ही बस स्थानकात नागरी सुविधांचा अभाव असल्याचे अनेक दिवसांपासून नागरिक व प्रवासी तक्रारी करत आहेत जुन्या बस स्थानकावर सार्वजनिक शौचालय झालीच पाहिजे अशी प्रमुख मागणी अनेक दिवसांपासून होत आहे पाथर्डी तालुक्यातील विविध धार्मिक स्थळाच्या दर्शनासाठी येणाऱ्या राज्यभरातील महिला भगिनी व प्रवासी हजारोच्या संख्येने येणाऱ्या शाळकरी विद्यार्थिनी यांची सार्वजनिक स्वच्छतागृह व शौचालय अभावी हेळसांड होत आहे जुन्या बस स्थानकाची सार्वजनिक शौचालय पाडून सहा ते सात वर्षे झाली आहे तेव्हापासून उघड्या जागेवरती कुठेतरी आडोशाला बसून शाळकरी विद्यार्थिनी महिला व पुरुष यांना लघुशंका करावी लागत आहे वासनंद झालेली व वक्रदृष्टीचे काही लोक लघुशंकेला महिला गेल्यानंतर त्यांच्याकडे असूरी नजरेने पाहत आहेत गेल्या १५ वर्षापासून या मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधी महिला आमदार आहेत परंतु एसटी आगारातील जुन्या बस स्थानकातील

पाथर्डी परिवहन आगारातील जुने बसस्थानक मोडीत काढून नवीन बसस्थानक निर्माण करणे यासह प्रवाशांच्या सुलभ शौचालय स्वच्छ फिल्टर युक्त पिण्याचे पाणी बस स्थानकात बस थांबण्यासाठी दर्जेदार डांबरीकरण व सपाटीकरण महिला प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसवणे अशा अनेक नागरी सुविधा निर्माण करणे यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मिळाला परंतु सद्यपरिस्थितीत बसस्थानकात नवनिर्मिती व नागरी सुविधा यांचा अभाव असून बस स्थानक निर्मितीतील करोडो रुपयांचा निधी कुठे खर्च केला याचे उत्तर जनतेला मिळाले पाहिजे.

( प्रा.सुनील पाखरे )

नागरी सुविधांच्या बस स्थानक स्वच्छता सुशोभीकरण व सोयी सुविधा अपूर्ण असल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे यामुळे लोकप्रतिनिधी व परिवहन मंडळ प्रशासनाने समदृष्टी ठेवून मतदार संघातील शाळकरी विद्यार्थिनी महिला व प्रवाशांच्या होणाऱ्या सुलभ सौचालयासह नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्याची मागणी प्रवासी करत आहेत.

# नान्नजला उपबाजाराचा मार्ग मोकळा; २.४० हेक्टर जमीन मंजूर!

## पै. शरद कार्ले यांच्या तीन वर्षांच्या पाठपुराव्याला यश



जामखेड। प्रतिनिधी

नान्नज परिसरातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय झाला असून, जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी नान्नज येथे २ हेक्टर ४० आर शासकीय जमीन मंजूर करण्यात आली आहे. ही जमीन नाममात्र एक रुपया कब्जेहक्क रकमेवर प्रदान करण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, उपबाजार उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी दिली. नान्नज हे जामखेडपासून सुमारे १५ ते १७ किलोमीटर अंतरावर आहे. या परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी जामखेड येथील बाजार समितीत आणताना वाहतूक खर्चासह अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. वेळ आणि पैशांचा अपव्यय होत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत होती. काही शेतकऱ्यांना बाजार समितीचे परवाने नसलेल्या व्यापाऱ्यांकडे शेतमाल विकावा लागत होता. अशा व्यवहारांत फसवणुकीचे प्रकारही समोर आल्याने नान्नज येथे स्वतंत्र उपबाजार सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली होती.

शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी उपसभापती आणि संचालक मंडळाच्या सहकार्याने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. उपबाजारासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी गेल्या तीन वर्षांपासून लावून धरण्यात आली होती. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने जमीन प्रदान करण्यास मान्यता दिली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. नान्नज येथे उपबाजार आवार उभारल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर शेतमालाच्या खरेदी-विक्रीची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वाहतूक खर्चात बचत होण्यासोबतच वेळेचीही बचत होईल. अधिकृत बाजारपेठ उपलब्ध झाल्याने शेतमालाच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढण्यास आणि स्थानिक कृषी व्यापाराला चालना मिळण्यास मदत होणार आहे. या निर्णयाबद्दल शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे आभार मानले आहेत. आता मंजूर जागेवर प्रत्यक्ष उपबाजार आवार उभारण्याची प्रक्रिया कधी सुरू होते, याकडे नान्नज परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामसेवक सुनील वाघ यांच्या विरोधात ग्रामस्थांच्या तक्रारी असल्याचा आरोप?

## एकनाथवाडी ग्रामपंचायतचा प्रशासकीय कारभार काढून घेण्याची लेखी मागणी!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी ग्रामपंचायत येथील कार्यरत ग्रामविकास अधिकारी सुनील अक्रूर वाघ यांनी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडे असणारा एकनाथवाडी ग्रामपंचायतचा प्रशासकीय कारभार कमी करण्याची लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे निवेदनात ग्रामसेवक सुनील वाघ यांनी म्हटल्याप्रमाणे सुनील वाघ यांच्याकडे ग्रामपंचायत एकनाथवाडी व अतिरिक्त कारभार भारजवाडी यामुळे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दोन्ही ग्रामपंचायतचा कारभार पाहणे अडचणीचे ठरत आहे सध्या दुष्काळी परिस्थिती असल्याने

एकनाथवाडी येथील जांभळवाडी जिल्हा परिषद शाळेचा इमारतीच्या विषयाच्या अनुषंगाने शेतकरी सुदाम नामदेव खेडकर यांच्या खाजगी गट नंबर ३७ मध्ये शाळेचे बांधकाम झाले आहे यामुळे काही निवडक ग्रामस्थांकडून माझे विरोधात वारंवार प्रशासकीय तक्रारी केल्या जातात त्यामुळे मी मानसिक दृष्ट्या खचलो असून एकनाथवाडी ग्रामपंचायत येथे कार्य करत असताना प्रशासकीय त्रुटी राहण्याची शक्यता असल्याने तो कारभार काढून घेण्यासाठी वरिष्ठांकडे लेखी अर्ज दिला आहे.

( सुनील वाघ) ग्राअ.एकनाथवाडी /भारजवाडी

एकनाथवाडी येथील शेतकरी सुदाम नामदेव खेडकर यांच्या शेतातील विहीर मंजुरी व गाय गोठे प्रस्ताव जाणीवपूर्वक अडवली जात असल्याचा आरोप युवक सिद्धार्थ खेडकर यांनी केला आहे यासंदर्भात ग्रामसेवकाच्या तक्रारी वरिष्ठ अधिकारी व अहिल्यानगर सीईओ आनंद भंडारी यांच्याकडे केल्या आहेत असे सिद्धार्थ खेडकर यांचे म्हणणे आहे त्या अनुषंगाने ग्रामसेवकाची चौकशी होणे अपेक्षित आहे.

(सिद्धार्थ खेडकर) एकनाथवाडी ग्रामस्थ

शेतीचे पंचनामे करणे टँकरने पाणीपुरवठा करणे जनावरांचा सर्वे करणे दोन्ही ग्रामपंचायतच्या पंतप्रधान घरकुल आवास योजनेचे ७७१ पेक्षा जास्त घरकुल मंजूर असून घरकुलांचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याने वरिष्ठ कार्यालयाकडून वारंवार सूचना येत आहेत तसेच मुख्यमंत्री पंचायतराज अभियान राबवणे ग्रामपंचायत कर वसुली करणे या सर्व कामांमध्ये वेळ जात आहे एकनाथवाडी ग्रामपंचायत तेथे प्रशासकीय काम करत असताना समज गैरसमज निर्माण होऊन माझे विरोधात वारंवार तक्रारी होत असल्याने एकनाथवाडी ग्रामपंचायतचा प्रशासकीय कारभार काढून घेण्यात यावा अशी विनंती ग्रामसेवक सुनील वाघ यांनी केली आहे.

# नाफेडच्या नफ्यातील रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना द्या; मुख्यमंत्री व केंद्र शासनाकडे निवेदन



जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयात आज नाफेडने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला शेतमाल अधिक दराने विकल्यानंतर, मूळ खरेदी किंमत व आवश्यक खर्च वजा करून उरणारी संपूर्ण फरकाची रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल यांना निवेदन देण्यात आले. त्यांच्या मार्फत ही मागणी मुख्यमंत्री तसेच केंद्र शासनाकडे पाठविण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांच्या कष्टातून मिळणाऱ्या वाढीव उत्पन्नाचा लाभ थेट शेतकऱ्यांनाच मिळावा, अशी भूमिका मांडण्यात आली. संकटात सापडलेल्या बळीराजाला त्याच्या स्वतःच्या कष्टातून आर्थिक आधार मिळावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी जालना मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अमोल ठाकूर, शुभम टेकाळे, रवी ढगे, नागेश डवले, महादेव वाघ, अंकुश पाचफुले, राहुल गवारे, बाळासाहेब पाचरणे, अक्षय अटोळे, दिलीप वाढेकर आणि पांडुरंग शिंदे उपस्थित होते.

# नवरात्र उत्सव आणि कीर्तन सोहळ्याची परंपरा कायम ठेवणार–राहुल लोणीकर

जालना। प्रतिनिधी

माणसाचे मन हरिनामात रमले, तर जीवनाला भक्तीचा खरा आनंद प्राप्त होतो. ज्याप्रमाणे पुत्राच्या शुभवार्तेने माता आनंदित होते, हरण नादात तल्लीन होते आणि कासवीची आपल्या पिलांवर निस्सीम माया असते, त्याचप्रमाणे मनाची ओढ परमेश्वराच्या चरणी असावी, असे हृदयस्पर्शी निरूपण ह.भ.प. सानप महाराज यांनी केले.




आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि राहुल लोणीकर मित्र मंडळाच्या वतीने परतूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे निरूपण करताना सानप महाराज यांनी भक्ती, श्रद्धा आणि ईश्वराशी असलेल्या नात्याचे महत्त्व उपस्थित भाविकांना पटवून दिले. या वेळी पंचक्रोशीतील भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यावेळी मनोगत व्यक्त करताना राहुल लोणीकर म्हणाले, ''परतूर नगरीतील भाविक नेहमीच धर्म, संस्कृती आणि अध्यात्मासाठी एकजुटीने पुढे येतात, ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संतपरंपरेचे जतन आणि नव्या पिढीमध्ये संस्कार रुजविण्यासाठी अशा धार्मिक सोहळ्यांची गरज आहे. नवरात्रोत्सवानिमित्त सुरू केलेली हरिकीर्तन सोहळ्याची ही परंपरा पुढील सात वर्षेही अखंड सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. धर्म आणि संस्कृतीच्या कार्यासाठी एकत्र येणाऱ्या भाविकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. एम. पी. मर्ढेकर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं.४ बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ फौजदारी अर्ज ८८५/२०२६**
**बबन सावंत वि. ग्रामसेवक**
**अर्जदार बबन पि. किसन सावंत,**
**वय– ५४ वर्षे, धंदा नोकरी, रा. बोरफडी, ता. जि. बीड.**

विरुध्द

गैरअर्जदार जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक, बोरफडी, ता.जि. बीड

मागणी अर्जः– रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात जन्माची नोंद जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोरफडी, ता. जि. बीड. च्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार नामे बबन पि. किसन सावंत यांचा जन्म दिनांक २४.०३.१९७२ रोजी बोरफडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना नामे बबन पि. किसन सावंत यांचे जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे बबन पि. किसन सावंत यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बोरफडी, ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु बबन पि. किसन सावंत यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोरफडी ता. जि. बीड. येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

दिले आज दिनांक १२ माहे ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
कनिष्ठ लिपिक

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक,
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड.

# अहिल्यानगरची नवदुर्गा,श्रध्दा अष्टेकर

अगदी सकाळीच जुने जिल्हा न्यायालय समोर वकील मित्रमंडळी सोबत चाय पे चर्चा करत असतानाच सायकल वरून वर्तमानपत्र टाकणा–या एका मुलीकडे सहजच लक्ष गेले. न राहुन मी तिच्याबरोबर बोलायला लागलो. आजकाल महिला सबली करणावर भरभरून चर्चा होत आहे. काही महिला किंवा मुली काम असुनही करीत नाहीत किंवा काहीना कामकाज मिळत नाही. पुरूष प्रधान संस्कृतीत काही पुरूष मंडळी कधी कधी महिलांना जाणुन बुजुन दुर्लक्षित करतात तर काहि महिला पुरूष मंडळीना विनाकारण त्रास देतात.

केवळ काम नाही म्हणून घरातील लोकांवर अवलंबून असणा–या अनेक मुली आहेत. आज महिला देशातील सर्वोच्च पदावर कार्यरत आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिलां भगिनींनीं आपल्या कार्याचा ठसा उमटवला नाही. मग नगरची नवदुर्गा श्रध्दा याला कशी अपवाद असणार. श्रध्दा बरोबर पाच मिनिटाच्या गप्पांमधून खरोखरच वाटले की, कोणत्याही परिस्थितीवर बेधडक पणे मात करण्याची जिद्द या मुलीकडे आली कुठून. श्रध्दाचे वडील संतोष दत्तात्रय अष्टेकर आणि आई सौ वैशाली हे अतिशय गरीब असलेले कुटुंब. श्रध्दाला भक्ती आणि आराध्या या दोन बहिणी आहेत.



श्रध्दाला भाऊ नाही. परंतु श्रध्दाने भावाची उणीव आईवडीलानां भासु दिली नाही. लहानपणापासूनच आजीच्या खानावळीत छोटीशी कामं करून मदत करणारी श्रध्दा कधीच डगमगून गेली नाही. आई वडील कामासाठी बाहेर गेल्यावर श्रध्दा घरातील कामकाज करुन आपल्या बहिणींची काळजी घेत होती. आईवडीलांना हातभार लावत होती. तिला थोडं बोलतं केल्यावर श्रद्धा निर्भिड पणे म्हणाली,'' काम कोणतेही लहान नाही, आपण चोरी करून पैसे मिळवत नाहीत, त्यामुळेच मी बिनधास्तपणे वयाचे सोळाव्या वर्षापासून वर्तमानपत्र वाटपाचे काम करीत आहे''. आजोबां बरोबर आणि वडिल यांचे बरोबर पेपर स्टॉलवर पेपर विक्री करुन श्रध्दा शिक्षण घेत होती. आज ती एमएस्सी मायक्रो बायोलॉजी चे शिक्षण घेत आहे. उन वारा पाऊस याची तमा न बाळगता श्रध्दा सायकल वरुन घरोघर जावुन वर्तमानपत्र टाकायचे काम करते. खरं तर आज सायकल वर वर्तमानपत्र वाटायचे दिवस नाहीत, कारण प्रत्येकालाच टुव्हिलर असते. मला असं वाटतंय की,वर्तमानपत्राचे क्षेत्रात अनेक महिला भगिनी चांगले काम करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. त्यांचे कार्य तर कौतुकास्पद आहेच . परंतु अहिल्यानगर मधे वर्तमानपत्र वाटणारी श्रध्दा हि कदाचित एकटीच मुलगी असावी. खरंतर वर्तमानपत्रात कार्य करणारे पत्रकार बांधव, संपादक साहेब आणि नगरवासियानीं या नवदुर्गेच्या कामाची दखल घेतली पाहिजेत. जर शक्य असेल तर तिला काही मदत करता येईल काय याचा विचार अहिल्यानगर च्या लोकप्रतिनिधीं कडून झाला तर तिचे पुढील शिक्षण सहज शक्य होईल. शिक्षणाचे आड गरीबी कधीच येत नाही हे श्रध्दाने सिध्द करून दाखवले असं म्हणायला हरकत नाही. नवरात्रोत्सवा निमित्त या नवदुर्गेची आणि माझी भेट होईल असे वाटले नव्हत. श्रद्धा सारख्या नवदुर्गेला मनापासून मनापर्यंत मानवंदना आणि पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

**शब्दांकन– अॅड शिवाजी अण्णा कराळे पाटील**

# केंद्र सरकारकडून दुष्काळ ग्रस्तांना मदत मिळवून देणार : रामदास आठवले

## बीडमध्ये रिपाइंच्या विराट जाहीर सभेला जनसागर उसळला

बीड । प्रतिनिधी

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडून तातडीची मदत मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे रिपाइंच्या वतीने मागणी करणार आहे. असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री मा.ना. रामदासजी आठवले यांनी बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर आयोजित विविध मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभेत केले.

दुष्काळामुळे निसर्गाने शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिरावून घेतला आहे चारा, पिण्याचे पाणी व मोलमजुरीचा प्रश्न गंभीर झाला आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना मदत मिळवून देण्यासाठी व गावागावात रोजगार हमीची कामे सुरू करण्यासाठी, कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रकरणी निकाली काढण्यासाठी, महात्मा फुले महामंडळासह सर्व महामंडळाचे कर्ज माफ करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. मराठा समाजाच्या आरक्षणास आमचा पाठिंबा असून गोरगरीब मराठा समाज बांधवांना आरक्षण मिळालेच पाहिजे ही





आमची अगोदरपासून भूमिका आहे. निसर्गाची परिस्थिती पावसामुळे बदलली आहे दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी नदी जोड प्रकल्पाची भूमिका मांडली होती, असे मंत्री रामदास आठवले विराट जाहीर सभेत म्हणाले.



विराट जाहीर सभेत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना एक लाख रुपये व शेतमजूर, कामगार, मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत देण्यात यावी. सुप्रिया सुळेच्या जावायाल तीन हजार एकर गायरान जमीन भाडेतत्त्वावर देण्यात येते. गोरगरीब, गायरान धारकांना गायरान जमिनी भाडेतत्त्वावर देण्यात याव्यात. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी व १९९० च्या शासन परिपत्रकास २०११ पर्यंत मुद्दतवाढ करण्यात यावी. रिपाइंच्या ◀◀ पान ३ वर

# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची 'आप'ची मागणी

बीड । प्रतिनिधी

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (डखठ) प्रक्रिया रद्द करावी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी (दि.१७) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी घंटानाद आंदोलन करण्यात आले.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना




निवेदन देण्यात आले. डखठ प्रक्रियेमुळे पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार बाधित होऊ नयेत, तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव अन्यायकारकपणे मतदार यादीतून वगळले जाऊ नये, अशी मागणी आंदोलकांनी केली. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्राप्त तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम ठेवावा, अशी

### घंटानाद आंदोलन

मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्यासह जिल्हा संघटक प्रा. ज्ञानेश्वर राऊत, शहराध्यक्ष सय्यद सादेक, रफिक पठाण, कृष्णा जगताप, आजम खान, कैलासचंद पालीवाल, डॉ. गणेश ढवळे, राजेंद्र आमटे, डॉ. संजय तांदळे, फारूक इनामदार यांच्यासह आपचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

अशोक येडे
आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष

# जयमहेश साखर कारखान्याचा ३,१२१ रुपये प्रतिटन एक रक्कमी भाव जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

जयमहेश शुगर इंडस्ट्रीज (एन एस एल) कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत व यावर्षी पडलेल्या दुष्काळामुळे जयमहेश (एन.एस.एल.) शुगर इंडस्ट्रीज ने उस उत्पादक शेतकऱ्यांना एफ आर पी २७९० रुपये प्रतिटन बसत असताना सुद्धा यावर्षी गाळपासाठी येणाऱ्या ऊससाठी ३,१२१/ रुपये प्रतिटन एक रक्कमी भाव जाहीर करण्यात आला असुन एफ आर पी पेक्षा ३३१ रुपये प्रतिटन भाव दिल्याने शेतकऱ्यांना दुष्काळात मोठा दिलासा मिळाला आहे.या ऊस




**कारखान्याला एफ.आर.पी.२,७९० बसत असताना एफ आर पी पेक्षा ३३१ रुपये प्रतिटन जास्त भाव देण्याचा निर्णय**

**दुष्काळात शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय; ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा**

दरवाढीमुळे ऊस उत्पादक शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी एफआरपीपेक्षा जास्त व योग्य दर मिळावा, या मागणीसाठी आक्रमक झाले होते.जयमहेश शुगर इंडस्ट्रीज (एन एस एल) कारखान्याचे प्रशासनाने यावर्षी पडलेला दुष्काळ आणी कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन कारखान्याला एफ आर पी २७९०/ प्रती टन बसत असताना सुद्धा एफ आर पी पेक्षा जास्त म्हणजेच ३३१ रु प्रतीटना प्रमाणे ◀◀ पान ३ वर

# भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्यास बहुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे!-अशोक रसाळ

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मभूमीत, पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडणार आहे.



भगवान भक्तीगडावरील दसरा मेळावा हा सर्व जाती-धर्मांना सोबत घेणारा, बहुजनांच्या एकतेचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक समरसतेचा मेळावा म्हणून ओळखला जातो. राष्ट्रसंत भगवान बाबांचे विचार आणि लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या कार्याची प्रेरणा घेऊन या मेळाव्यातून सामाजिक एकतेचा संदेश दिला जातो.

या मेळाव्याला बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मांतील नागरिक, बहुजन बांधव, भगवान बाबांचे भक्त आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बहुजन एकतेचा जागर करावा, असे आवाहन भाजप बीड तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात नवरात्र महोत्सवात नवदुर्गांचा होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

नवरात्र उत्सवाच्या काळात जिल्हा रुग्णालयात जन्मणाऱ्या मुलींचा बेबी कीट व त्यांना जन्म देणाऱ्या मातांचा साडी-चोळी देऊन सत्कार करण्याचा संकल्प जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार मधुकरराव सोळंके यांनी केला आहे.

जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी असुन आजही काही लोक गर्भलिंग तपासणी करत आहेत. मुलगी असल्याचे समजताच तिची गर्भातच हत्या केली जात आहे. हाच धागा पकडून लोकांमध्ये जनजागृती व्हावी, समाजात चांगला संदेश जावा व त्यातूनच लेक वाचवा हा संदेश देखील दिला जाणार आहे. जिल्हा रुग्णालयात जन्म होणाऱ्या या दुर्गामुळे स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तराचे संतुलन सुधारण्यास मदत मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे. हा उपक्रम जिल्हा रुग्णालय, बीड व केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाद्वारे बेटी बचाव बेटी पढाव या उपक्रमांतर्गत साजरा करण्यात येणार आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



**पिंपळवंडी:- श्री.रेणुकामाता मंदिर अंमळनेर महिला सप्ताहात युवा नेते भाऊसाहेब भवर,सरपंच अशोक जेधे,महेश खेंगरे,उद्योजक गोकुळ राऊत यांच्या सत्कारप्रसंगी प्रा. मनोज पवार,पिनू पोकळे, भाऊसाहेब पवार,सुरेश नाना,अप्पा पवार,काका नरसाळे,बिबीशन नवले व गांवकरी.**

# भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा!

## ना. पंकजाताई मुंडे व प्रीतमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळावा; बालासाहेब चोले यांचे आवाहन

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मभूमीतील सावरगाव घाट येथे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्याची तयारी सुरू झाली आहे. यंदा हा मेळावा २० ऑक्टोबर रोजी होणार असून, राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळावा पार पडणार आहे.

भगवान भक्तीगडावरील दसरा मेळावा हा वंचितांचा आणि



शोषितांचा मेळावा म्हणून ओळखला जातो. राष्ट्रसंत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या परळी तालुक्यातील सावरगाव घाट येथे दरवर्षी लाखो भाविक मोठ्या श्रद्धेने



आणि उत्साहाने उपस्थित राहतात.

राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त आणि मुंडे समर्थक मोठ्या संख्येने या मेळाव्यासाठी दाखल होतात. सावरगाव घाट येथे पाण्यावर ज्ञानेश्वरी वाचत असलेल्या राष्ट्रसंत भगवान बाबांची भव्य मूर्ती तसेच परिसरातील ऐतिहासिक वास्तू हे या स्थळाचे प्रमुख आकर्षण आहे.

यंदाच्या दसरा मेळाव्याला ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक आणि भक्तिमय मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी भगवान भक्तीगडावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपाचे जिल्हा सचिव बालासाहेब चोले यांनी केले आहे.

# बुखारी माध्यमिक व उच्च माध्यमिक उर्दू शाळेची क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी!

**अंडर-१७ कराटे स्पर्धेत जैद सादेक शेख जिल्ह्यात प्रथम; विभागीय स्पर्धेसाठी निवड**

माजलगाव । प्रतिनिधी

बुखारी माध्यमिक व उच्च माध्यमिक उर्दू शाळा तथा उर्दू ज्युनियर कॉलेज, माजलगाव येथील इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या जैद सादेक शेख याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. क्रीडा व युवक सेवा



संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेतील अंडर-१७ कराटे स्पर्धेत त्याने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड मिळवली.

दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे झालेल्या या स्पर्धेत जैदने आपल्या उत्कृष्ट खेळाचे, चपळाईचे ◀◀ पान ३ वर

# तांदळवाडी घाट तलावातील अवैध पाणीउपसा रोखला

## मोटारीचे पाईप हटवून वीजपुरवठा खंडित

बीड । प्रतिनिधी

पाणीटंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे संरक्षण करणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे . याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सूचनेनुसार मांजरसुंबा मंडळातील तांदळवाडी घाट तलावात अवैधरित्या पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल पथकाने कारवाई केली .

तलाव परिसरात मोटारीचे पाईप आढळल्याने ते काढून बाजूला करण्यात आले . दत्ता उत्तम टेकडी यांची



एक मोटार जागेवर बंद अवस्थेत आढळली . संबंधित शेतकऱ्याने मोटार काढून दिल्यानंतर त्याला सर्वांसमक्ष ताकीद देण्यात आली . तलाव परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून , काढलेले पाईप पोलीस पाटील दिगंबर खोसे यांच्या ताब्यात देण्यात आले . यापुढे तलावात पाईप व मोटार टाकून पाणीउपसा करू नये , अशी सूचना संबंधितांना देण्यात आली.

या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी शिरसकर व ओव्हाळ , मंडळ अधिकारी सोनाली कदम , ग्रामसेवक लांडगे , सरपंच बळीराम शिरसाठ , पोलीस पाटील दिगंबर खोसे , पाणीपुरवठा कर्मचारी , उपसरपंच , शिपाई व ग्रामस्थ सहभागी झाले.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठा जपण्याचे आणि पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी ◀◀ पान ३ वर

# माजलगाव - मोठीवाडी एस.टी. बससेवा तात्काळ सुरू करा; अन्यथा 'रस्ता रोको'चा इशारा



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी परिसरातील नागरिकांना नियमित एस.टी. बससेवा उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी, अन्यथा माजलगाव - पाथरी राष्ट्रीय महामार्गावरील मोठीवाडी फाटा येथे 'रस्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मोठेवाडी ग्रामस्थांच्या वतीने माजलगाव आगार प्रमुखांना दि.१७ आक्टोंबर शनिवार रोजी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

मोठीवाडी आणि लगतच्या परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य प्रवाशांना शिक्षण, आरोग्य, शासकीय व इतर अत्यावश्यक कामांसाठी रोज माजलगाव येथे जावे लागते. मात्र, नियमित बस नसल्याने प्रवाशांचा वेळ आणि पैसा वाया जात असून गैरसोय होत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.

त्यामुळे माजलगाव ते मोठीवाडी या मार्गावर नियमित एस.टी. बससेवा त्वरित सुरू करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मागणीचा गांभीर्याने विचार न झाल्यास ग्रामस्थ, विद्यार्थी व नागरिकांच्या वतीने दि.१९ आक्टोंबर सोमवार रोजी सकाळी १० वाजता मोठीवाडी फाट्यावर रस्ता रोको आंदोलन केले जाईल आणि यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनावर माजी सरपंच अविनाश गोंडे, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष जगन्नाथ खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे, अंगद खेत्री, कॉ. भगवान पवार, सुदर्शन हिवरकर,वचिष्ट गोंडे, अशोक रासवे यांच्यासह विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26